DOWNLOADED FROM
WWW.AYUTECH.NET
AyuTech™
WHATSAPP - 9420697079

प्रथम वर्ष आयुर्वेदाचार्य २०१२ च्या अभ्यासक्रमावर आधारीत

# मौलिक सिद्धान्त

**प्रा. वैद्य मिलिंद आवारे**
प्राध्यापक
**संस्कृत संहिता सिद्धांत विभाग**
प्राचार्य,
श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय, नाशिक

**वैद्य अभिजित सराफ**
अधिव्याख्याता
**संस्कृत संहिता सिद्धांत विभाग**
श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय, नाशिक

**मौलिक सिद्धान्त**
ISBN : 978-93-80744-35-3

**आत्रेय प्रकाशन**

:: **प्रकाशिका**
**सौ. सुषमा प्र. सराफ**
'माऊली', गोकुळवाडी, श्रीरंगनगर,
गंगापूर रोड, नाशिक – ४२२ ०१३
दूरध्वनी : ०२५३-२५७६२०३

© डॉ. मिलिंद बी. आवारे
गुरूकुंज आश्रम, ता. तिवसा,
जि. अमरावती – ४४४ ९०२.

**:: संपर्क**
**वैद्य मिलिंद आवारे**
मो. ०९६६५७६६६०० E-mail : drmilindaware@gmail.com
**वैद्य अभिजित सराफ**
मो. ०८८८८८८७९८२ E-mail : drabhijeetsaraf@gmail.com

प्रथम आवृत्ती ऑक्टोबर २०१५ – १००० प्रति
द्वितीय आवृत्ती नोव्हेंबर २०१५ – २००० प्रति


:: **मुद्रक**
रिप्लिका प्रिंटर्स
२, चिटको सेंटर, वकीलवाडी, नाशिक फोन – २५८०००४

:: **अक्षर जुळणी**
श्री. मुकेश काळे,
ज्योती सिरीज, नाशिक

:: **मुखपृष्ठ**
श्री. अनिल घोडके

किंमत : १२०/-

गुरूमाऊली



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

## अर्पण पत्रिका

यांच्या आशीर्वादाने आयुष्यातील प्रत्येक ध्येय सहज साध्य झाले असे माझे ज्येष्ठ बंधु स्व. नितीन उर्फ रामविलास बाबाराव आवारे यांना माझे हे पुस्तकरूपी पुष्प समर्पित करीत आहे...

– **वैदय मिलिंद आवारे**

## ।। श्री धन्वन्तरये नमः ।।



# प्रस्तावना

विशेष करून प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून हे पुस्तक लिहिणे हा उपक्रम प्रशंसनीय आहे.

मित्रांनो, आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर, पूर्वी कधीही परिचय न झालेले विषय तुम्हाला अभ्यासावे लागणार आहेत. हे सर्व विषय फक्त परीक्षेचे विषय नाहीत हे पक्के ध्यानात घ्यावे. तेंव्हा अभ्यास करतांना अभ्यासक्रम, त्यांचे महत्वाचे बिंदू, प्रश्नपत्रिकेत येऊ शकणारे संभाव्य प्रश्न, परीक्षेत विचारले जाण्याची शक्यता नसलेले विषय ह्या मुद्यांचा फार विचार न करता, समग्र संपूर्ण विषयच समजून घेण्याचा पूर्ण प्रयत्न करा. तरच त्या विषयांच्या अभ्यासाचा तुम्हाला फायदा होणार आहे. केवळ परीक्षेचा अभ्यास करून त्या त्या विषयात यश संपादन करणे हे ध्येय ठेऊ नका. सगळा विषय मला समजलाच पाहिजे हे ध्येय ठेवूनच अभ्यासाचा प्रारंभ करा. हे विषय निरर्थक, काहीही उपयोग नसलेले आहेत असे समजू नका. मौलिक सिद्धांत, पदार्थ विज्ञान, संस्कृत इत्यादी विषय आयुर्वेद समजण्याकरिता अत्यंत आवश्यक आहेत. त्यांचा अभ्यास करून परीक्षेत यशस्वी झाल्यावर विसरुन जाण्याचे हे विषय नाहीत. चरक आदि ग्रंथ पुढे मूळातून संस्कृत मधूनच वाचावे लागतात. प्रत्येक शब्दांचे, वाक्यांचे अभिप्रेत अर्थ desired meaning स्वत:ला समजून घ्यावे लागतात. त्या साठी तंत्रयुक्तिंचा, संस्कृतचा उपयोग अवश्य करावा लागतो.

मराठी, इंग्रजी भाषांतर करणाऱ्या प्रत्येकाने ते लिहिले असतीलच असे गृहीत धरता येत नाही. स्वावलंबन हा उत्तम मार्ग आहे त्या साठी मौलिक सिद्धान्त आणि मौलिक विषय संस्कृत, पदार्थ विज्ञान आत्ता चांगले समजून त्यांचा उपयोग आपण पुढच्या काळात करावयाचा असतो हे जाणून ह्या विषयांचा संपूर्ण अभ्यास करणे हे आपले ध्येय असू द्या. ते ध्येय पूर्ण करण्यासाठी हे पुस्तक आपणास सहायक ठरेल ह्याविषयी मला विश्वास आहे.

शुभं भवतु ।

**– प्रा.वैद्य अनंत धर्माधिकारी**
प्राध्यापक, कायचिकित्सा,
Ex-Director of Ayurved, Maharashtra State

# मनोगत

भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने प्रथमवर्ष आयुर्वेदाचार्य २०१२ या प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता अभ्यासक्रमामध्ये बदल करून नवीन अभ्यासक्रम सुरू केला. त्यामध्ये पूर्वीच्या अष्टांगहृदय या विषयासोबत 'मौलिक सिद्धांत' हा विषय समाविष्ट करण्यात आला परंतु प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता 'मौलिक सिद्धांत' या विषयाच्या अभ्यासक्रमात असलेले बरेच मुद्दे एकत्रित एकाच ठिकाणी उपलब्ध नाहीत त्यामुळे या विषयातील सर्व मुद्दे एकत्रित करून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सरळ व सोप्या पद्धतीने हा विषय समजावा या करिता सदर विषयास पुस्तकाचे स्वरूप देण्याचा विचार मनात आला हा विचार मी माझ्या मित्र व ज्येष्ठ गुरूतुल्य प्राध्यापकांसमोर ठेवला त्यावेळी त्यांनी सुद्धा या विषयाच्या पुस्तकाची प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अतिशय आवश्यकता आहे, त्यामुळे अत्यावश्यक मुद्यांचे ग्रंथोक्त संकलन करून पुस्तकाची निर्मिती करण्यासंबंधीचे मत त्यांनी मांडले. त्यामुळे मला संबंधीत विषयाचे पुस्तक लिहिण्यास प्रोत्साहन मिळाले.

'मौलिक सिद्धांत' हा विषय प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता नवीन असून या विषयांवर अभ्यासक्रमातील सर्व मुद्दे एकाच पुस्तकात उपलब्ध असलेले शास्त्रशुद्ध पुस्तक उपलब्ध नाही व सध्या अभ्यासक्रमामध्ये उपलब्ध असलेल्या पुस्तकांमधून संकल्पना स्पष्ट होत नाही. मौलिक सिद्धांत विषयातील मुद्दे विद्यार्थ्यांना सरळ व सोप्या पद्धतीने कळावेत या करिता सदर विषयाच्या अभ्यासक्रमातील मुद्यांचे संकलन व चांगला विचार करून या विषयावर चांगले मुद्देसुद पुस्तक लिहायचे ठरवून पुस्तक लिहिण्यास सुरूवात केली.

पुस्तकात सर्व सिद्धांत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा विचार करून अधिकाधिक सोपे करण्याचा आणि आवश्यक तेवढेच लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मूळात विषयच समजण्यास अवघड आणि अपरिचित असल्याने एकदा वाचून सर्व समजेल अशी अपेक्षाही नाही. परतपरत वाचून सर्व संकल्पना स्पष्ट व्हाव्यात आणि एकाच पुस्तकात विषयांच्या अभ्यासक्रमातील सर्व मुद्द्यांची पूर्तता व्हावी हाच मुख्य हेतू आहे.

'मौलिक सिद्धांत' या विषयात सुलभ प्रवेश होण्यासाठी हे पुस्तक उपयोगी पडेल अशी आशा आहे. पुस्तक अधिकाधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे तरी काही चूका व त्रुटी राहणारच, त्यासंबंधी विद्वानांनी मार्गदर्शन करावे, अशी नम्र विनंती

आहे. तसेच या पुस्तकास पूर्णत्वाकडे नेण्यास माझ्या महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खुप अनमोल सहकार्य मिळाले. त्याचप्रमाणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ. बाळासाहेब आहेर सरांनी वेळोवेळी केलेले सहकार्य सतत स्मरणात राहण्यासारखे आहे.

माझे आई वडील सौ. सरला व श्री. बाबासाहेब आवारे, बहीण सौ. सीमा – श्री. सुनिल बोंडे यांच्या आशीर्वादामुळे हे सर्व शक्य होऊ शकले. माझी पत्नी सौ. शुभांगी आवारे तसेच सौ. भावना दंडे, कु. श्रुति टाकळकर, अंकिता, वेदांत यांच्या अनमोल सहकार्यातून या पुस्तकास पूर्ण रूप प्राप्त होऊ शकले. त्याचप्रमाणे गुरू माऊली वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व माझे ज्येष्ठ बंधु स्व. रामविलास उर्फ नितीन आवारे यांचे चरणी सदर पुस्तकरूपी पुष्प समर्पित करीत आहे.

धन्यवाद !

**– वैद्य मिलिंद बाबाराव आवारे**

# हृद्गत

CCIM ने २०१२ साली केलेल्या अभ्यासक्रमाच्या फेररचनेमध्ये प्रथम वर्षाच्या 'अष्टांगहृदय' ह्या विषयामध्ये २५ गुणांसाठी 'मौलिक सिद्धान्त' या विषयवस्तुचा समावेश केला.

तन्त्रयुक्ति, तन्त्रगुण, ताच्छिल्य, अर्थाश्रय, कल्पना इत्यादि विषय हे फक्त संहितेच्या अभ्यासकांनी वा संहिता विषयात पदव्यूत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वा Literary Reserch करणाऱ्या संशोधकांनीच अभ्यासायचे असतात, असा एक गैरसमज आहे. जे पुस्तकातील कीडे असतात, अशा practice न करणाऱ्या केवळ वाचाळवीरांचाच हा आवडता विषय आहे, असाही एक अपप्रचार आहे.

वास्तविकता मात्र याहून भिन्न आहे. तन्त्रयुक्त्यादि विषय हे मूल संहिता प्राकृतपणे व सखोलरीत्या समजून घेण्यासाठी आवश्यक आहेत. मूळ सूत्रातील संक्षेपाने वर्णन केलेला विषय समजून त्यातील गूढ अर्थ उमगण्यासाठी तन्त्रयुक्ति आदि विषय हे साधनभूत आहेत. जर मूळ ग्रंथच नीट उमगला नाही तर त्या आधारे केले जाणारे रूग्णपरीक्षण, निदान व त्यानुसार चिकित्सा ही कार्ये देखील चुकणार. त्यामुळे तन्त्रयुक्ति इत्यादि विषय हे Literary, Fundamental tools तर आहेतच पण ते Clinical tools सुद्धा आहेत.

ग्रंथलिखाणाची संहिताकारांची पद्धत समजल्यावर त्यातून प्रकट होणारी अर्थनिष्पत्ति व त्याची व्यवहारात चिकित्सेमध्ये येणारी प्रचिती ही प्रक्रिया अत्यंत रोमांचक व आनंददायक असते.

त्यामुळे या मूलभूत विषयाचा समावेश प्रथम वर्षाच्याच अभ्यासक्रमात केल्याबद्दल Central council of Indian medicine चे करावे तेवढे अभिनन्दन थोडेच आहे. त्यांना शतशः आभार.

हा विषय समजण्यास, आकलनास क्लिष्ट आहे, हे मान्य. मात्र एकदा समजल्यावर त्या आधारे गूढ गर्भित अर्थ सुद्धा व्यक्त होतात.

हाच उद्देश या पुस्तकाच्या लिखाणामागे आहे. नाशिकच्या श्रीसप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालयात संहिता विभागात अधिव्याख्याता पदावर कार्यरत झाल्यावर आदरणीय वैद्य श्री. आवारे सरांनी लिहिलेल्या या पुस्तकातील विषयभागाची प्रत माझ्या हातात ठेवली व यावर संस्करण करून, तन्त्रयुक्तिं या भागाचे लिखाण करून याला पुस्तकरूप

देण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे हे पुस्तक आकाराला आले आहे. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याला सोप्या तऱ्हेने हा विषय समजावा, या पद्धतीने वैद्य आवारे सरांनी लिखाण केलेले आहे व त्यानुसारच तन्त्रयुक्ति आदि उर्वरीत भागाचे लिखाण व पुस्तकावरील संस्करण करणे, मला सोपे गेले. सरांच्या माझ्यावरील या विश्वासास व प्रेमास पात्र ठरण्याच्या मी प्रयत्न केला आहे.

माझे गुरूवर्य वैद्य श्री.स.प्र. सरदेशमुख, यांची सतत इच्छा असते की, मी सातत्याने लिहित राहावे. या प्रेरणेनेच हे पुस्तक साकारले आहे. त्यांचे अकृत्रिम प्रेम हा माझ्या आयुष्याचा अमूल्य ठेवा आहे.

या पुस्तकांच्या लिखाणाच्या कामात व या काळात माझ्या विभागातील वैद्य नारायण पाटील, वैद्य नितीन जाधव, वैद्य ज्ञानदा भुजबळ, तसेच वैद्य अरूण भुजबळ (शारीररचना विभाग), वैद्य माधवी गायकवाड (शारीरक्रिया विभाग) यांचे अलोट सहकार्य प्राप्त झाले.

आयुर्वेद महाविद्यालय, वाघोली येथील संहिता विभागाच्या प्रपाठक वैद्य राणीबाला नेमाडे यांचे अत्यंत मौलिक सहकार्य या कामासाठी लाभले.

माझे आई वडिल सौ. सुषमा व डॉ. प्रकाश सराफ, काका-काकु सौ. रश्मी व श्री. राजेंद्र सराफ, बंधुद्वय डॉ. आनंद सराफ व चि. तनय सराफ यांच्या माझ्या वरील निर्व्याज्य प्रेम व आधारामुळेच मी हे काम करू शकलो. माझी पत्नी सौ. अंजलि सराफ हीने तर लेखनिक, मुखपृष्ठ करणे, वाचक अशी सर्वतोपरी भूमिका निभावली.

श्री. मुकेश काळे यांनी न कंटाळता या पुस्तकाची अक्षर जुळणी केली. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद.

या सर्वांच्या ऋणानुबन्धाच्या नाजूक धाग्यांनी हे पुस्तक व मी वेढले गेलो आहे.

सर्वात शेवटी, ज्यांच्या मुळे मला संहिता वाचनाची दिशा व दृष्टी मिळाली. ज्यांच्यामुळे मी जोमाने संहिता अध्ययन अध्यापन संभाषा करीत आहे त्या माझ्या गुरूवर्य वैद्यराज अनंत धर्माधिकारी सरांच्या प्रेम व आशीर्वादाला स्मरून हे पुस्तक त्यांच्या चरणी समर्पित करतो.

इति शम् ।

**– वैद्य अभिजित सराफ**

# अनुक्रमणिका


प्रस्तावना ........ ७
मनोगत ........ ९
हृद्गत ........ ११
विषय प्रवेश ........ १५
शास्त्र लक्षण ........ १७
तन्त्रयुक्ति ........ २३
व्याख्या ........ ५२
तन्त्रदोष ........ ५७
ताच्छील्य ........ ६२
कल्पना ........ ६८
अर्थाश्रय ........ ७२
अष्टप्रकृति ........ ८१
महत् ........ ८७
अहंकार ........ ८९
पंचतन्मात्रा ........ ९२


**शास्त्रं ज्योतिः प्रकाशार्थं दर्शनं बुद्धिरात्मनः ।**
**ताभ्यां भिषक् सुयुक्ताभ्यां चिकित्सान्नापराध्यति ।।**

# विषय प्रवेश

प्रत्येक शास्त्र हे त्याच्या विशिष्ट संकल्पना, परिभाषा, लक्षणे, अभ्यासपद्धति, ध्येय, साध्य इत्यादि घटकांनी युक्त असते. खरे पाहता, ज्यामध्ये या घटकांची पूर्तता असते, त्यालाच शास्त्र असे संबोधले जाते.

प्राचीन काळी तत्कालिन शास्त्रज्ञांनी, अभ्यासकांनी शास्त्र लिखाणाच्या, शास्त्र वाचनाच्या, शास्त्राभ्यासाच्या व शास्त्रार्थ समजून घेऊन व्यवहारात आणण्याच्या विविध युक्त्या निर्माण केल्या. विविध पद्धति प्रस्थापित केल्या. त्याद्वारे शास्त्राचा गर्भितार्थ समजून त्याचे शास्त्रत्व सिद्ध करता येते.

यालाच तर्क भाषा असे म्हंटले गेले. यामध्ये तन्त्रयुक्ति, व्याख्या, अर्थाश्रय, कल्पना इत्यादिंचा समावेश होतो. तर्क भाषामुळे कोणत्याही शास्त्राचे प्रबोधन व प्रकाशन होते.

आयुर्वेद ज्यावेळी शास्त्र म्हणून प्रस्थापित झाले, तेव्हा त्यालाही या तर्कभाषेच्या कसोट्या, लावून मगच त्याची रचना झाली. त्यामुळे आयुर्वेदाचा अभ्यास करण्यासाठी तन्त्रयुक्ति, व्याख्या, अर्थाश्रय, कल्पना या सर्वांचा अभ्यास आधीच करणे अत्यावश्यक आहे. याच हेतूने या विषयाचा समावेश प्रथम वर्ष आयुर्वेदाचार्य अभ्यासक्रमात केला गेला.

तन्त्रगुणांसोबत शास्त्र कसे नसावे, हे सांगण्यासाठी तन्त्रदोषांचीही रचना झाली. त्यांचाही अभ्यास आवश्यक आहे.

तसेच प्रकृति, अहंकार, पुरूष, महत् व इन्द्रिये या सृष्टी व चतुर्विंशतिक पुरूषाच्या उत्पत्ति घटकांचा अभ्यास सुद्धा आवश्यक आहे. कारण हे सर्व मूलतत्त्वे आहे. सृष्टीतील सर्व घटक - शरीर, औषधी, खनिज, प्राणी इत्यादि हे याच मूलतत्त्वांपासून उत्पन्न झालेले आहेत. प्राचीन शास्त्रज्ञांनी, तत्ववेत्त्यांनी याचे चिंतन करून या घटकांच्या तत्वलक्षणांची निश्चिती केलेली आहे. शरीराचे व औषधाचे मूलस्वरूप सदैव माहिती असणे, हे चिकित्सकाला आवश्यक आहे. म्हणून प्रकृत्यादि घटकांचा अभ्यास सुद्धा आवश्यक आहे.

अशा प्रकारे या सर्व घटकांचा समावेश करून 'मौलिक सिद्धान्त' नामक अभ्यास घटक प्रथम वर्षाला योजला गेला.

याचे अध्ययन हे फक्त प्रथम वर्षापुरते मर्यादित नसून चिकित्सा करताना सुद्धा आवश्यक आहे.

या पुस्तकात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वरील विषयांची तोंड ओळख व्हावी, या हेतूने त्रोटक स्वरूपात वर्णन केले आहे. अभ्यासकांनी मूल ग्रंथांच्या साहाय्याने या घटकांचा पुढील विशेष अभ्यास करावा. पुस्तकातील हे वर्णन त्रोटक स्वरूपात असून परिपूर्ण नाही. प्रत्येक घटकाची विस्तृत उदाहरणे अभ्यासकाने स्व-अभ्यासाने समजून घ्यावी.

अध्यापकांनी शिकविताना या मुद्द्यांच्या आधारे विस्तार करून, आणखी उदाहरणांसह विषय मांडावा, अशी अपेक्षा आहे.

या अभ्यास प्रवासाला प्रथम मार्गदर्शक म्हणून या पुस्तकाचा उपयोग होईल, असा विश्वास वाटतो.



# शास्त्र लक्षण (तन्त्र लक्षण)

**शिष्यतेऽनेनेति शास्त्रम् शास् + ष्ट्रन् ।**

– वाचस्पत्यम्

अर्थात शासन करणाऱ्या ग्रंथास शास्त्र असे म्हणतात.

**'प्रवृत्तिर्वा निवृत्तिर्वा नित्येन कृतकेन वा ।**
**पुंसां येनोपदिश्येत तच्छास्त्रमभिधीयते' ।।**

– तर्कभाषा-तत्वालोक, पृ. ४

अर्थात ज्यामध्ये मनुष्याकरिता शुभाशुभ कर्माचा निर्देश किंवा उपदेश केलेला असेल त्यास 'शास्त्र' असे म्हणतात.

शुभाशुभ कर्माचा अर्थ शुभ तसेच अशुभ कर्माशी संबंधीत आहे.

**शुभकर्म – ज्या कर्मांनी ऐहलौकिक आणि पारलौकिक अभ्युदयाची** (उन्नती/प्रगती) प्राप्ति होते त्यास शुभ कर्म म्हणतात.

अशुभकर्म – जे कर्म केल्याने अकल्याण किंवा अधः पतन होत असेल त्या कर्मांस अशुभ कर्म म्हणतात.

वेद, पुराण, धर्मशास्त्र, स्मृति, आयुर्वेद आदि. मनुष्याच्या कल्याणाकरिता सत्कर्मामध्ये प्रवृत्ति आणि असत्कर्मापासून निवृत्ति संबंधी उपदेश देतात, त्यास शास्त्र म्हणतात.

**'शंसनात् वा शास्त्रम्' ।**

– निरूक्तम्

वेदान्तमतानुसार एखाद्या गूढ तत्वाचे 'शंसन' (प्रतिपादन) करणाऱ्या ग्रंथास शास्त्र म्हणतात.

गूढ तत्वाचा अर्थ 'ब्रह्मत्व', अतः ब्रह्मत्वाचे प्रतिपादन करणाऱ्या वेदान्त आदि करिता 'शास्त्र' शब्दाचा प्रयोग केला जातो अशा प्रकारे कोणत्याही शास्त्राकरिता **'शासन' आणि 'शंसन' या दोन्ही गुणांचे असणे अनिवार्य आहे.**

चरकांनी विमानस्थान आठव्या अध्यायात उत्तम शास्त्राचे गुणलक्षण वर्णन केलेले आहे ते पुढीलप्रमाणे.

१. शास्त्र हे उत्तम गुणांनी अलंकृत असावे. या गुणांचे वर्णन पुढील प्रमाणे.

**<u>शास्त्र गुण</u> –**

**बुद्धिमानात्मनः कार्यगुरूलाघवं कर्मफलमनुबन्धं देशकालौ च विदित्वा युक्तिदर्शनाद् भिषग्बुभूषुः शास्त्रमेवादितः परीक्षेत । विविधानि हिं शास्त्राणि भिषजां प्रचरन्ति लोके; तत्र यन्मन्येत सुमहद्यशस्विधीरपुरूषासेवितमर्थबहुलम् आप्तजनपूजितं त्रिविधशिष्यबुद्धिहितमपगतपुनरूक्तदोषमार्षं सुप्रणीतसूत्रभाष्य सङ्ग्रहक्रमं स्वाधारमनवपतितशब्दमकष्टशब्दं पुष्कलाभिधानं क्रमागतार्थम् अर्थतत्त्वविनिश्चयप्रधानं सङ्गतार्थमसङ्कुलप्रकरणमाशुप्रबोधकं लक्षणवत् च उदाहरणवच्च, तदभिप्रपद्येत शास्त्रम् । शास्त्रं ह्ययवंविधममलं इवादित्यस्तमो विधूय प्रकाशयति सर्वम् ।।३।। च.वि. ८/३**

बुद्धिमान अर्थात विवेकशील पुरूष आपल्या कार्याची गुरूता, लघुता, कर्मफल, (आयुर्वेदाच्या अध्ययनाने धर्म, अर्थ, काम व मोक्ष याचा प्राप्ती करणे) अनुबन्ध (कर्मजनित शुभ किंवा अशुभ), देश, काल, अनुकूलता किंवा प्रतिकूलता यांचा विचार करून युक्तियुक्त होऊन वैद्य होण्याची इच्छा ठेवून सर्वप्रथम शास्त्राची परीक्षा करतो कारण चिकित्सक समाजात विविध प्रकारच्या शास्त्र संसारात प्रचलित आहे त्यामुळे लक्षण असलेल्या शास्त्राची नियुक्ती करावी.

**उत्तम शास्त्राचे एकुण अठरा लक्षण शास्त्रात वर्णन केलेले आहेत.**

**शास्त्र गुण**

| क्र. | शास्त्र गुण | क्र. | शास्त्र गुण |
|---|---|---|---|
| १ | सुमहद्यशस्विधीरपुरूषासेवितम् | १० | अकष्टशब्दम् |
| २ | अर्थ बहुलम् | ११ | पुष्कलाभिधानम् |
| ३ | आप्तजनपुजितम् | १२ | क्रमागतार्थम् |
| ४ | त्रिविधशिष्यबुद्धीहितम् | १३ | अर्थतत्वविनिश्चयप्रधानम् |
| ५ | अपगतपुनरूक्तदोषम् | १४ | सङ्गतार्थम् |
| ६ | आर्षम् | १५ | असङ्कुलप्रकरणम् |
| ७ | सुप्रणितसुत्रभाष्यसंग्रहक्रम् | १६ | आशुप्रबोधकम् |
| ८ | स्वाधारम् | १७ | लक्षणवत् |
| ९ | अनवपतितशब्दम् | १८ | उदाहरणवत् |



## शास्त्र गुण –

१) सुमहद्यशस्विधीरपुरूषासेवितम् – शास्त्र यशस्वी, धैर्यवान पुरूषांद्वारे आद्यन्त (संपूर्ण) अध्ययन केलेले असावे त्यांनी परिशीलित अर्थात लिहिलेले असावे.

२) अर्थ बहुलम् – शास्त्रामध्ये अनेक विषयांचा प्रसंगोचित समावेश केलेला असावा.

३) आप्तजन पूजितम् – प्रामाणिक पुरूषाद्वारे सन्मानित. ज्यांचे वाक्य सदैव मान्य व सत्य असते त्यांना आप्त म्हणतात अशा पुरूषाद्वारे सन्मानित शास्त्र.

४) त्रिविधशिष्यबुद्धिहितम् – त्रिविध शिष्य यांच्या बुद्धीस हितकर म्हणजेच उत्तम, मध्यम, साधारण बुद्धीच्या शिष्यास सहज ज्ञान प्राप्त होईल असे शास्त्र.

५) अपगतपुनरूक्तदोषम् – एकच विषय वारंवार वर्णन करणे त्यास पुनरूक्त दोष म्हणतात. ज्यामध्ये एखाद्या विषयाचे विनाकारण वारंवार वर्णन केलेले नसेल, ते उत्तम शास्त्र होय.

६) आर्षम् – शास्त्राची निर्मिती ऋषि अर्थात सर्व तन्त्र स्वतंत्र किंवा त्रिकालज्ञान संपन्न विव्दानांद्वारे झालेली असावी.

७) सुप्रणितसूत्रभाष्यसंग्रहक्रम् – ज्या शास्त्राची निर्मिती प्रथम सूत्रक्रमाने व नंतर त्याच विषयाचें व्याख्यान क्रमाने वर्णन (करून संग्रह) करणे, म्हणजेच सूत्र, भाष्य, संग्रह या क्रमाने शास्त्राची निर्मिती असावी.

८) स्वाधारम् – शास्त्राचे नाव सुंदर अर्थयुक्त असून त्यामध्ये अध्यायांची नावे अध्यायान्तर्गत विषयांची संबंधीत असावी.

९) अनवपतित शब्दम् – शास्त्रातील अध्यायाच्या नावामध्ये व्याकरण संबंधी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी असू नये. तसेच निकृष्ट ग्राम्य शब्दाचा वापर नसावा.

१०) अकष्टशब्दम् – शास्त्रातील अध्यायाचे नाव किंवा विषयाचे उच्चारण करण्यामध्ये कष्टप्रद नसावे. सहजतेने त्याचे उच्चारण करता यावे.

११) पुष्कलाभिधानम् – शास्त्राचे अथवा अध्यायाचे नाव संबंधीत शास्त्रातील विषयवस्तुचा परिचय करून देणारे असावे.

१२) क्रमागतार्थम् – ज्या क्रमाने उल्लेख केला असेल त्याच क्रमाने त्या विषयाचे विवेचन केलेले असावे. शास्त्रात विषयाचा सन्निवेश किंवा वर्णन क्रमशः केलेले असावे.

१३) अर्थतत्वविनिश्चय प्रधानम् – शास्त्रातील वर्णित अर्थातील (विषयातील) रहस्य मथितार्थ पूर्णतः प्रकट किंवा स्पष्ट करण्यास समर्थ असावे.

१४) सङ्गतार्थम् – शास्त्र संबंधित विषयांनी (अर्थ) युक्त असावे.

१५) असङ्कुलप्रकरणम् – शास्त्र हे त्यामधील संबंधित विषय सोडून अन्य निरर्थक विषयांनी व्याप्त नसावे. अर्थात प्रकरणामध्ये ज्या विषयाचा प्रारंभ केला असेल त्यामध्ये अन्य निरर्थक विषयांचा उल्लेख नसावा.

१६) आशुप्रबोधकम् – लवकर अर्थाचा बोध होईल किंवा शीघ्र समजण्यास सक्षम असावे.

१७) लक्षणवत् – पदाचे लक्षण स्पष्ट करणारे असावे. उदाहरणार्थ आयुर्वेद शास्त्रातील विषय विवेचन त्रिस्कंधात्मक (हेतु लिंग औषध) असावे.

१८) उदाहरणवत् – पदांना उदाहरणांनी स्पष्ट केलेले. समर्पक दृष्टान्तांचे वर्णन असावे.

अशा उपरोक्त लक्षण संपन्न शास्त्राचे अध्ययन करावे. अशा लक्षणांनी संपन्न शास्त्र हे निर्मल सूर्याप्रमाणे किंवा ज्या सूर्यावर ढग किंवा ग्रहण आच्छादित नसेल, असा सूर्य अंधःकार दूर करून सर्व सृष्टीस प्रकाशमान करतो त्याचप्रमाणे लक्षणसंपन्न शास्त्रज्ञान हे मूर्खतारूपी अंधःकार दूर करून ज्ञानमय ज्योतीद्वारा अन्तरात्म्यास प्रकाशित करते.

**२. हिताहितं सुखं दुःखं आयुस्तस्य हिताहितम् ।**
**मानं च तच्च यत्रोक्तं आयुर्वेदः स उच्यते ।। च.सू. १**

हितायु, अहितायु, सुखायु, दुःखायु यांचे हित व अहित तसेच आयुचे मान (प्रमाण) ज्यामध्ये सांगितलेले असते, त्याला आयुर्वेद म्हणतात. ही आयुर्वेदाची लक्षणात्मक व्याख्या आहे.

**३. सोऽयं आयुर्वेदः शाश्वतो निर्दिश्यते अनादित्वात्**
**स्वभावसंसिद्धलक्षणत्वात् भावस्वभावनित्यत्वाच्च ।। च.सू. ३०**

आयुर्वेद हा शाश्वत आहे. कारण अनादित्व, स्वभावसंसिद्ध लक्षणत्व व भाव स्वभाव नित्यत्व हि त्याची लक्षणं आहेत.



**४. तद् आयुर्वेद्यति इति आयुर्वेदः । च.सू. ३०**

आयुष्याचे ज्ञान करून देणारे, आयु समजून देणारे ते आयुर्वेद शास्त्र होय.

**५. तन्त्रं तन्त्रार्थान् स्थानं स्थानार्थान् अध्यायम् अध्यायार्थान् प्रश्नं प्रश्नार्थाश्चेति, पृष्टेन चैतद्वक्तव्यमशेषेण वाक्यशो वाक्यार्थशोऽर्थावयवशश्चेति ।। च.सू. ३०/३०**

तंत्र तंत्रार्थादि ८ घटकांनी शास्त्रयुक्त असावेत. तंत्र, तंत्रार्थ, स्थानार्थ अध्याय अध्यायार्थ प्रश्न प्रश्नार्थ यांचा विचार करून त्या अनुषंगाने शास्त्राचा अभ्यास करावा.

## शास्त्र कोणास शिकवू नये –

चक्रपाणिंनी आयुर्वेद शास्त्र कोणास शिकवू नये, याचे वर्णन केले आहे.

१. शारीरिक – मानसिक असमर्थता – ज्याला आयुर्वेदाचे अध्ययन व चिकित्सा कार्य हे स्व-शक्ति पेक्षा कठिण वाटते.
२. जो आयुर्वेदाच्या चिकित्सेने आरोग्यादि फल प्राप्त करू इच्छित नाही.
३. जो आयुर्वेदाच्या ज्ञानाला अनुपयोगी मानतो.
४. जो एकाच सीमित प्रदेशात राहतो. प्रवासाची ताकद वा इच्छा नाही.
५. जो वृद्ध असल्याने साकल्याने आयुर्वेदाध्ययन करू शकणार नाही.

अशा व्यक्तीला आयुर्वेदाचे ज्ञान देऊ नये.
या यादीमध्ये कुठेही जाती, धर्म, लिंग, यांच्या भेदाभेदाचे वर्णन नाही.
(सं. चक्रपाणि टीका च.वि. ८/५)

## शास्त्र पर्याय –

**तत्रायुर्वेदः शाखा विद्या सूत्रं ज्ञानं शास्त्रं लक्षणं तन्त्रमित्यनर्थान्तरम् ।।**
– च.सू. ३०/३१

आयुर्वेद शास्त्राचे पर्याय ह्या सूत्रात वर्णन केले आहेत. आयुर्वेद, शाखा, विद्या, सूत्र, ज्ञान, शास्त्र, लक्षण व तन्त्र हे पर्याय आहेत. ह्यानुसार शास्त्र व तन्त्र हे एकमेकांचे पर्यायवाचक शब्द होतात.

म्हणून शास्त्राभ्यासासाठी, तन्त्रयुक्त्यादि तन्त्रगुण व तन्त्रदोष यांचा अभ्यास असणे आवश्यक आहे.

**शास्त्राभ्यास**

- **तन्त्रगुण युक्त**
  - तन्त्रयुक्ति ३६
  - व्याख्या १५
  - कल्पना ७
  - कल्पनांचे अर्थाश्रय २०
  - ताच्छिल्यादि १७
- **तन्त्रदोषवर्जित**
  - तन्त्रदोष १५

**इति तन्त्रगुणैर्युक्तं तन्त्रदोषैर्विवर्जितम् ।**
**चिकित्साशास्त्रमखिलं व्याप्य यत् परितः स्थितम् ।।**

– अ.हृ.उ ४०/७८

**इदमन्यूनशब्दार्थं तन्त्रदोषविवर्जितम् ।**
**षड्विंशता विचित्राभिर्भूषितं तन्त्रयुक्तिभिः ।।**

– च.सि. १२/४१

तन्त्रगुणांनी युक्त व तन्त्रदोषांनी वर्जित अशा उत्तम शास्त्राचे अध्ययन करावे ह्यासाठी तन्त्रयुक्त्यादि तन्त्रगुण व तन्त्रदोष ह्यांचे मूलतः अध्ययन अत्यावश्यक आहे.

**तन्त्र – तन्त्र्यते धार्यते शरीरमनेनेति तन्त्रम् ।**

– अरूणदत्त टीका

## तन्त्र गुण –

**तन्त्र्यते धार्यते शरीरमनेनेति तन्त्रम्, तस्य गुणाः तन्त्रगुणाः,**
**– यैस्तन्त्रमलङ्क्रियते, तन्त्रयुक्तादयः, तैः एवं प्रकारै युक्तम् ।।**

– अरूणदत्त टीका

तन्त्राचे गुण म्हणजे तन्त्रगुण होय; ज्याद्वारे तन्त्र अलंकृत होते. तन्त्रयुक्ति, व्याख्या इत्यादि हे तन्त्रगुण आहे. योग्य प्रकारे त्याची तन्त्रामध्ये योजना करावी.



# तन्त्रयुक्ति

प्राचीन काळी प्रत्येक शास्त्राची रचना करताना, त्या शास्त्राची बैठक बसवण्यासाठी, त्यामध्ये कमीत कमी त्रुटी राहण्यासाठी, तन्त्रयुक्तिंची रचना करण्यात आली.

तन्त्रयुक्ति ह्या शास्त्र व शास्त्राचा गूढ, अनुक्त अर्थ समजून त्या शास्त्राच्या व्यावहारिक उपयुक्ततेसाठी महत्त्वाच्या आहेत.

तन्त्रयुक्तींच्या अभ्यासाने त्यांचा वापर केल्याने प्रत्यक्ष उल्लेख न केलेल्या विषयांचा ऊहापोह करता येतो.

तन्त्रयुक्ति ह्या शास्त्राभ्यासाचा शास्त्रार्थ समजण्यासाठी, व शास्त्राच्या व्यावहारिक उपयुक्ततेसाठी महत्त्वाचे साधनस्वरूपी (Tools) आहेत.

## तन्त्रयुक्ति संख्या –

विविध काळातील विविध तन्त्रकर्त्यांनी तन्त्रयुक्तींचे विविध प्रकारे वर्णन केले. त्यामुळे कालतः फरक पडल्यामुळे तन्त्रयुक्तींच्या संख्येमध्ये फरक आढळतो.

| संहिता | संख्या |
|---|---|
| कौटिल्य | ३२ |
| सुश्रुत संहिता | ३२ |
| चरक संहिता | ३६ |
| अष्टांग हृदय | ३६ |
| अष्टांग संग्रह | ३६ |
| भट्टार हरिश्चन्द्र | ४० |

सुश्रुत संहितेच्या उत्तरतन्त्राच्या ६५ व्या अध्यायामध्ये तन्त्रयुक्तिंचे नामोल्लेख आहेत, व त्यांचे विस्ताराने वर्णन टीकाकार डल्हण यांनी केले आहेत.

त्याचप्रमाणे चरक संहिता सिद्धिस्थान १२ वा अध्याय व अष्टांग हृदय उत्तरतन्त्र ४० वा अध्याय व अष्टांग संग्रह उत्तरतन्त्र ५० वा अध्याय यामध्ये तन्त्रयुक्तिंचे नामोल्लेख आहेत, व त्यांचे अनुक्रमे चक्रपाणि, अरूणदत्त व इन्दु ह्या टीकाकारांनी लक्षण व उदाहरणांसह वर्णन केले आहे.

## तन्त्रयुक्तिचे महत्त्व –

**इदमन्यूनशब्दार्थं तन्त्रदोषविवर्जितम् ।**
**षड्विंशता विचित्राभिर्भूषितं तन्त्रयुक्तिभिः ।।**

– च.सि. १२/४१

विविध तन्त्रयुक्ति ह्या शास्त्राला विभूषित करीत असतात. तन्त्रगुणांनी युक्त व तन्त्रदोषांनी वर्जित असे शास्त्रच 'उत्तम व परिपूर्ण शास्त्र' समजले जाते. तन्त्रयुक्ति ह्या तन्त्रगुणांपैकी आहेत. म्हणून तन्त्रयुक्तिंचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

**यथा अम्बुजवनस्यार्कः प्रदीपो वेश्मनो यथा ।**
**प्रबोधनप्रकाशार्थास्तथा तन्त्रस्य युक्तयः ।।**

– च.सि. १२/४६

दृढबलांनी दोन दृष्टांताच्या आधारे तन्त्रयुक्तिंचे कार्य व महत्त्व विशद केले आहे.

दृष्टान्त १ – ज्याप्रमाणे सूर्य हा संकुचित झालेल्या कमळाच्या वनाला विकासित करतो, त्याप्रमाणे तन्त्रयुक्ति ह्या संकुचित, गूढ अशा शास्त्राच्या अर्थाचे विकासन करतात.

ह्यालाच 'प्रबोधन' असे म्हणतात शास्त्राच्या योग्य अर्थाचा बोध तन्त्रयुक्तिमुळे होतो. विस्तारक ह्या अर्थाने प्रबोधन हे कार्य होते.

दृष्टान्त २ – ज्या प्रमाणे अंधाराने भरलेल्या घरात दिव्याच्या उजेडामुळे प्रकाशन होते, सर्व गोष्टी लख्ख दिसू लागतात, त्याप्रमाणे तन्त्रयुक्तिंच्या साहाय्याने सहज आकलन होऊ न शकणाऱ्या गूढ अशा शास्त्रविषयांचे प्रकाशन होते.

अशाप्रकारे **'प्रबोधन'** व **'प्रकाशन'** ह्या दोन कर्मांमुळे तन्त्रयुक्ति ह्या महत्त्वाच्या आहेत.

**एकस्मिन्नपि यस्येह शास्त्रे लब्धास्पदा मतिः ।**
**स शास्त्रमन्यदप्याशु युक्तिज्ञत्वात् प्रबुध्यते ।।**

– च.सि. १२/४७

जो व्यक्ति तन्त्रयुक्तिंचा समग्र अभ्यास करून तन्त्रयुक्तींच्या साहाय्याने एका शास्त्राचा अभ्यास करतो, त्यात प्रावीण्य मिळवतो, तो व्यक्तिला तन्त्रयुक्तिंचा मूलतः अभ्यास असल्याने दुसरे अन्य कुठलेही शास्त्र त्वरित समजु शकतो.

हे तन्त्रयुक्तिंचे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व आहे.



**अधीयानोऽपि शास्त्राणि तन्त्रयुक्त्या विना भिषक् ।**
**नाधिगच्छति शास्त्रार्थानर्थान् भाग्यक्षये यथा ।।**

– च.सि. १२/४८

जो वैद्य तन्त्रयुक्तींच्या अभ्यासाशिवाय शास्त्राचे अध्ययन करतो, त्याने शास्त्राचे कितीही अवलोकन, पठण केले तरी तो वैद्य शास्त्राच्या सर्वांगीण अर्थापर्यंत पोहचु शकत नाही. शास्त्राचा गूढार्थ समजू शकत नाही. तो शास्त्राच्या मूळ गाभ्यापर्यंत पोहोचु शकत नाही.

यासाठी एक दृष्टान्त दिला आहे की, ज्याप्रमाणे भाग्यक्षय झालेल्या व्यक्तिला अर्थ (पैसा) प्राप्त होत नाही. त्याप्रमाणे तन्त्रयुक्तिंच्या शिवाय शास्त्राध्ययन केलेल्या वैद्याला शास्त्राचा खरा अर्थ प्राप्त होऊ शकत नाही.

## तन्त्रयुक्ति निरूक्ति –

'तन्त्र' पदाचा अर्थ शास्त्र हा होय. 'युक्ति' म्हणजे योजना करणे.

**तन्त्र – तन्त्र्यते धार्यते शरीरमनेनेति तन्त्रम् ।**

– अरूणदत्त टीका

**तस्य युक्तयः योजना तन्त्रयुक्तयः ।**

– डल्हण, सु.उ. ६५

तन्त्र हे नानाविध तन्त्रयुक्तींनी अलंकृत झालेले असते.

**विचित्राभिः भूषितं तन्त्रयुक्तिभिः ।**

– च.सि. १२

ह्या सूत्रावरील टीकेत चक्रपाणिंनी 'विचित्राभिः' पदाचा अर्थ 'विचित्रार्थन्याययुक्ताभिः' असा केला आहे.

तंत्रातील/शास्त्रातील विविध प्रकारचे अर्थ किंवा विषय न्यायपूर्वक म्हणजे यथायोग्य पद्धतीने आकलन व्हावेत. यासाठी अनुसारलेल्या लेखनातील योजना म्हणजेच तन्त्रयुक्ति होय.

## तन्त्रयुक्तींची नावे –

संदर्भ – च.सि. १२/४१-४५

| क्र. | तन्त्रयुक्ति | क्र. | तन्त्रयुक्ति |
|---|---|---|---|
| १ | अधिकरण | १९ | विपर्यय |
| २ | योग | २० | पूर्वपक्ष |
| ३ | हेत्वर्थ | २१ | विधान |
| ४ | पदार्थ | २२ | अनुमत |
| ५ | प्रदेश | २३ | व्याख्यान |
| ६ | उद्देश | २४ | संशय |
| ७ | निर्देश | २५ | अतीतावेक्षण |
| ८ | वाक्यशेष | २६ | अनागतावेक्षण |
| ९ | प्रयोजन | २७ | स्वसंज्ञा |
| १० | उपदेश | २८ | ऊह्य |
| ११ | अपदेश | २९ | समुच्चय |
| १२ | अतिदेश | ३० | निदर्शन |
| १३ | अर्थापत्ति | ३१ | निर्वचन |
| १४ | निर्णय | ३२ | संनियोग/नियोग |
| १५ | प्रसंग | ३३ | विकल्पन/विकल्प |
| १६ | एकान्त | ३४ | प्रत्युत्सार |
| १७ | अनेकान्त | ३५ | उद्धार |
| १८ | अपवर्ग | ३६ | संभव |

यानंतर सर्व तन्त्रयुक्तिंचे अतिशय थोडक्यात वर्णन करण्यात येत आहे, जे प्रथम वर्ष आयुर्वेदाचार्य अभ्यासासाठी पुरेसे असेल



## १) अधिकरण –

**अधिकरणं नाम यदधिकृत्य प्रवर्तते शास्त्रं स्थानमध्याय: प्रकरणं वाक्यं वा ।**

– अरूणदत्त

**अधिकरणं नाम यमर्थमधिकृत्य प्रवर्तते कर्ता ।**

– चक्रपाणि

हि पहिली तंत्रयुक्ति आहे, ज्या विषयाचे वर्णन चाललेले असेल, त्या प्रमाणे त्या सूत्रातील वा वाक्यातील पदांचे अर्थ लावावे लागतात. ज्या विषयाच्या अनुषंगाने वर्णन चालु असेल त्याला त्या विषयाचे अधिकरण असे म्हणतात. अधिकरणानुसार शब्दांचे अर्थ बदलतात. उदा. चरक सूत्रस्थान २६ अध्यायात रस शब्दाचा अर्थ चव असा आहे. तर चरक चिकित्सा १५ अध्यायात रस शब्दाचा अर्थ आद्य धातू असा होतो तर रसशास्त्राच्या संदर्भात रस शब्दाचा अर्थ पारा असा होतो.

अरूण दत्तांनी अधिकरणाचे ५ प्रकार पाडले आहेत.

अ) शास्त्राधिकरण
ब) स्थानाधिकरण
क) अध्यायाधिकरण
ड) प्रकरणाधिकरण
इ) वाक्याधिकरण

याचे विवरण पुढीलप्रमाणे

अ) **शास्त्राधिकरण** – ज्या विषयाच्या अनुरोधाने शास्त्राची निर्मिती केली गेली असेल ते शास्त्राधिकरण असते.
उदा. स्वस्थ आणि रूग्ण या दोहोंच्या आरोग्याच्या संदर्भात आयुर्वेद शास्त्राची निर्मिती झाली. नृत्य, नाट्य, काव्य हे भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचे अधिकरण आहे.

ब) स्थानाधिकरण – ग्रंथाची रचना स्थानांमध्ये केलेली असते. प्रत्येक स्थानाचा एक विशेष अर्थ व विषय असतो त्याला स्थानाधिकरण असे म्हणतात.
उदा. जसे फुलांचा हार करण्यासाठी, गुंफण्यासाठी सूत्राची (दोरीची) गरज असते त्याप्रमाणे सूत्रस्थान होय.

क) अध्यायाधिकरण – स्थानांची विभागणी काही अध्यायांमध्ये केलेली असते. प्रत्येक अध्यायाचा एक विषय असतो त्याला अध्यायाधिकरण असे म्हणतात. उदा. संपूर्ण दिवसातील आचरण हे दिनचर्या अध्यायाचे अधिकरण

आहे.

ड) प्रकरणाधिकरण - एका अध्यायामध्ये विविध प्रकरणे असतात त्या प्रकरणांचा विषय म्हणजेच प्रकरणाधिकरण होय. उदा. अ.हृ.शा. अध्याय ३ मध्ये सिरावर्णन हो एक प्रकरण आहे.

ई) वाक्याधिकरण - अनेक पदे मिळून वाक्य तयार होते आणि अनेक वाक्ये मिळून प्रकरण तयार होते. प्रत्येक वाक्यानुसार त्यातील पदांचा अर्थ निश्चित करावा लागतो.

## २) योग -

**येन वाक्यं युज्यते स योगः ।**

- सुश्रुत

**योगो नाम योजना व्यस्तानां पदानां एकीकरणम् ।**

- चक्रपाणि

**योगो नाम योजना । उद्देशनिर्देशयोः सूत्रभाष्ययोः वा ।**

- अरूणदत्त

योग म्हणजे योजना. प्रकरणामध्ये वर्णन केलेल्या वाक्यांची अन्वयानुसार रचना करणे, व्यस्त पदांचे एकीकरण करणे याला योग असे म्हणतात. वाक्यातील अथवा श्लोकांतील पदांची अर्थदृष्ट्या योग्य जुळवणी म्हणजे योग होय. अरूणदत्तांनी ही योजना उद्देश, निर्देश, सूत्र, भाष्य यांच्या मध्ये संभवते असे वर्णन केले आहे.

चक्रपाणिंनी योगाच्या व्याख्येत प्रतिज्ञादि पंच अवयवी वाक्यांचे उदाहरण देऊन त्या आधारे वर्णन केले आहे.

योग म्हणजे युक्ति असाही अर्थ आहे. एखाद्या विषयाचे युक्तिपूर्वक पंचावयवी वाक्यामध्ये रचना करणे म्हणजे योग होय.

उदा. तैलं पिबेच्चामृतवल्लिनिम्बहिंस्राभयावृक्षकपिप्पलीभिः । सिद्धं बलाभ्यां च सदेवदारूहिताय नित्यं गलगण्डरोगे । - सु.चि. १८

या ठिकाणी सिद्ध हे पद तैल या पदाशी जोडून मग त्यांचा अर्थ लावावा लागतो.



## ३) हेत्वर्थ

**हेत्वर्थो नाम यद् अन्यप्रस्तावोक्तम् अन्यत्रापि तथैवोपपद्यते ।**

- अरूणदत्त

**हेत्वर्थो नाम यदन्यत्राभिहितमन्यत्रोपपद्यते ।**

- चक्रपाणि

एका ठिकाणी केलेल्या विवेचनाच्या आधारे तत्सदृश अन्य ठिकाणचा अर्थ करणे.

हेतु म्हणजे प्रयोजन किंवा उद्देश. हा उद्देशरूप अर्थ ज्या दोघांत समान असतो, त्यापैकी एकाच्या आधारे दुसऱ्या बद्दल विवेचन करणे, म्हणजे हेत्वर्थ होय.

एका संबंधात सांगितलेले दुसऱ्याच्या संबंधात उपपन्न होणे म्हणजे हेत्वर्थ होय.

उदा. १) समान गुणांचा अभ्यास हा धातूंच्या वृद्धिचे कारण असतो. हे वायूच्या अधिकरणाने वर्णन केले. हे वर्णन जसे वायूबद्दल सांगितले तसे पित्त, कफ, रसादि अन्य घटकांबद्दलही समजून घ्यावे.

२) ज्या प्रमाणे मातीचा पिण्ड पाण्याच्या योगाने ओलसर होतो; त्याप्रमाणे उडीद, दूध इत्यादी द्रव्यांच्या सेवनाने व्रणामध्ये क्लेद उत्पन्न होतो.

## ४) पदार्थ -

**पदार्थो नाम पदेनार्थो गम्यते । यथा द्रव्यमिति पदम्, तस्यार्थो भूजलादिः ।**

- अरूणदत्त

**पदार्थो नाम पदस्य पदयोः पदानां वाऽर्थः पदार्थः ।**

- चक्रपाणि

दोन किंवा अधिक वर्ण (स्वर आणि व्यंजने) एकत्र येऊन, जेव्हा त्यांना विभक्ति किंवा प्रत्यय जोडला जातो, तेव्हा त्याला पद अशी संज्ञा प्राप्त होते.

सुप्तिङ्गन्तं पदम् । - पाणिनि

अशा पदापासून जेव्हा काही विशिष्ट अर्थाचा बोध होतो, तेव्हा त्यास 'पदार्थ' अशी तन्त्रयुक्ति म्हणतात.

हा विशेष अर्थ एका पदापासून उत्पन्न होतो किंवा पदसमूहापासून एकत्रित अर्थ उत्पन्न होत असतो. उदा. 'द्रव्य' हे एक पद आहे, त्याचा अर्थ ज्यावर कर्म व गुण आश्रित असून ते त्यांचे समवायि कारण असते, जसे भू, जल, अग्नि इ.इ. असा होतो.

'आयुषो वेदः' ह्या दोन पदांपासून आयुबोधक अशा तन्त्राचा अभिप्राय होतो व एका प्रकरणात वा वाक्यात आलेल्या अनेक पदांच्या सामुहिक अर्थापासून एका विशिष्ट विषयाच्या अर्थाचे प्रकटीकरण होते.

## ५) प्रदेश –

**प्रदेशो नाम येषामर्थानामतिबहुत्वात् साकल्येन अभिधानस्य अशक्यत्वात् स्तोकमुच्यते ।**

– अरूणदत्त

**प्रदेशो नाम यत् बहुत्वादर्थस्य कात्स्न्येन अभिधातुमशक्यमेकदेशेनाभिधीयते ।**

– चक्रपाणि

ह्या तन्त्रयुक्तिला 'एकदेश तन्त्रयुक्ति' असेही म्हणतात.

ज्यावेळी एखाद्या विषयाचे सविस्तर पूर्णतः वर्णन करणे हे अशक्य असते, त्याने 'अतिविस्तृत' हा तन्त्रदोष उत्पन्न होण्याची शक्यता असते, अशावेळी त्या विषयाचे थोडक्यात किंवा एखाद्याच अंशाचे वर्णन केले जाते, ह्याला प्रदेश किंवा एकदेश तन्त्रयुक्ति असे म्हणतात.

उदा. १) **'अनुपानैकदेशोऽयमुक्तः** प्रायोपयोगिकः ।' – च.सू. २७

'अनुपान' ह्या विषयाचे विस्ताराने वर्णन करणे हे ग्रंथविस्तार करणारे आहे. म्हणून सूत्रस्थानामध्ये प्रायः उपयोगी असणाऱ्या अशाच अनुपानांचे एकदेशाने वर्णन केलेले आहे.

२) इति द्रवैकदेशोऽयं यथास्थूलमुदाहृतः । – अ.हृ.सू. ५/८४

द्रवद्रव्यविज्ञानीय अध्यायात द्रवांचे उदाहरण/उपलक्षण मात्र वर्णन केले आहे. विस्ताराने वर्णन केल्यास तन्त्रदोष उत्पन्न होऊ शकतो.

## ६) उद्देश –

**उद्देशो नाम सङ्क्षेपाभिधानम् ।**

– अरूणदत्त / चक्रपाणि

ज्या विषयाचे वर्णन करायचे आहे, त्याचे सुरुवातीला संक्षेपाने उल्लेख करणे म्हणजे उद्देश तन्त्रयुक्ति होय.

उदा. १) अष्टांग हृदयाच्या सूत्रस्थान अध्याय १ मध्ये दोषांच्या वर्णनाच्या आधी त्यांची नावे व क्रम एका सूत्रात वर्ण केला गेला. वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः । – अ.हृ.सू १/६

२) 'हेतुलिङ्गौषधज्ञानम्' ह्या सूत्रात संपूर्ण आयुर्वेद शास्त्राचा विषय विस्तार संक्षेपाने मांडला गेला.

## ७) निर्देश –

**निर्देशो नाम तस्यैव विस्तारोक्तिः ।**

– अरूणदत्त

**निर्देशो नाम संख्येयोक्तस्य विवरणम् ।**

– चक्रपाणि

उद्देश क्रमाने त्या विषयाचे, घटकांचे वर्णन जसे आले असेल, त्याच क्रमाने त्यांचे विस्ताराने वर्णन करणे, म्हणजे निर्देश तन्त्रयुक्ति होय.

उदा. १) दोषांची नावे व क्रम वर्णन करून झाल्यावर आता त्यांचे विविध अनुषंगाने वर्णन करणे ह्याला निर्देश तन्त्रयुक्ति असे म्हणतात.

२) त्रिसूत्रात्मक वर्णन करून मग त्या प्रत्येकाचे क्रमाने विस्ताराने वर्णन करणे म्हणजे निर्देश होय.

## ८) वाक्यशेष –

**वाक्यशेषो नाम यस्मिन् सूत्रे लाघविकेन अर्थात् गम्यमानमनुक्तपूरणार्थमध्याह्रियते ।**

– अरूणदत्त

**वाक्यशेषो नाम यत् लाघवार्थमाचार्येण वाक्येषु पदमकृतं गम्यमानतया पूर्यते ।**

– चक्रपाणि

अरूणदत्त व चक्रपाणि दोघांनीही एकाच अर्थाने वर्णन केले आहे.

विषय वर्णन करताना, सूत्ररचना करताना, त्या सूत्रामध्ये जे पद साक्षात वर्णन केलेले नसते, तरीही त्या सूत्राचा अर्थ लावताना, असे अनुक्त पद तिथे गृहीत धरावे लागते. तरच सूत्राचा पूर्ण अर्थ लागतो.

अनेकदा सूत्रलाघवार्थ, छंदामध्ये बसवण्यासाठी किंवा ग्रन्थविस्तारभयास्तव

एखादे पद सूत्रामध्ये साक्षात् वर्णन केलेले नसते, ते त्याठिकाणी गृहीत धरून अर्थ लावणे, ह्यालाच 'वाक्यशेष तन्त्रयुक्ति' म्हणतात.

उदा.

१) 'तत्र खात् खानि देहेऽस्मिन्' । अ.हृ.शा. ३/३ ह्या सूत्रात वाक्य पूर्ण होण्यासाठी 'भवन्ति' हे क्रियापद गृहीत धरून मग अर्थनिश्चिती करावी लागते.

२) 'जाङगलजै रसैः' ह्यामध्ये 'मांस' हे पद गृहीत धरून मग अर्थ लावावा लागतो.

३) 'परस्परगुणविरूद्धानि कानिचित्, कानिचित् संयोगात्' । च.सू. २६/८२ ह्या सूत्रात कानिचित् परस्परगुणविरूद्धानि असे म्हंटल्यावर कानिचित् परस्परगुणसमानानि असा वाक्यशेष गृहीत धरावा लागतो. 'कानिचित् संयोगात्' असे म्हंटल्यावर 'कानिचित् वियोगात्' असा वाक्यशेष गृहीत धरावा लागतो.

४) व्यक्तः शुष्कस्य च आदौ च रसो द्रव्यस्य लक्ष्यते । च.सू. २६/२८

शुष्कस्य चेति चकारात् आर्द्रस्य च, आदौ च इति चकारात् अन्ते च । चक्रपाणि टीका

'शुष्कस्य च' ह्या पदात चकाराने आर्द्रस्य च हे वाक्यशेष धरून व 'आदौ च' मध्ये 'अन्ते च' हा वाक्यशेष धरून,

व्यक्तः शुष्कस्य आर्द्रस्य च आदौ अन्ते च रसो द्रव्यस्य लक्ष्यते । असे वाक्य पूर्ण करून मगच अर्थ लावावा लागतो.

## ९) प्रयोजन –

**प्रयोजनं नाम यदर्थं शास्त्रादि प्रवर्तते ।**

– अरूणदत्त

**प्रयोजनं नाम यदर्थं कामयमानः प्रवर्तते ।**

– चक्रपाणि

ज्या उद्देशाने / हेतुने / प्रयोजनाने एखाद्या शास्त्राचे वा विषयाचे वा प्रकरणाचे वर्णन केलेले असेल, त्याला प्रयोजन म्हणावे, व त्यानुसार त्या तन्त्र / विषय / प्रकरणाचा अर्थ लावणे, ह्यास प्रयोजन तन्त्रयुक्ति म्हणतात. एखाद्या तन्त्र वा विषय वा प्रकरणाचा हेतु सांगणे, म्हणजे प्रयोजन होय.

उदा. धातुसाम्यक्रिया चोक्ता तन्त्रस्यास्य प्रयोजनम् । – च.सू. १

आयुर्वेदतन्त्राचे प्रयोजन हे 'धातुसाम्यक्रिया' हे आहे. म्हणजेच आयुर्वेदातील प्रत्येक घटकाचे/गोष्टीचे वर्णन हे धातुसाम्य प्रस्थापित करणे, ह्याच अनुषंगाने केले गेले आहे.



## १०) उपदेश –

**उपदेशो नाम आप्तवचनम् ।**

– अरूणदत्त

**उपदेशो नाम आप्तानुशासनम् ।**

– चक्रपाणि

ग्रंथरचना करताना त्यातील विषयांची सिद्धि ही चतुर्विध प्रमाणांद्वारा केलेली असते. त्यामध्ये ज्या विषयांचे ग्राह्यत्व हे साक्षात् आप्तवचनाद्वारे होते. आप्तांचे वचन हेच प्रामाण्य असते, त्याला 'उपदेश तन्त्रयुक्ति' म्हणतात.

असे असे करावे, याप्रमाणे जेथे सांगितले जाते, तो उपदेश

उदा.

१) सामान्यतः रात्री जागू नये व दिवसा झोपु नये.

२) आधी स्नेहविधि करावा मगच स्वेदविधि करावा. (च.सू. १३)

## ११) अपदेश –

**अपदेशो नाम यदाचार्यः किञ्चिदर्थं प्रतिज्ञाय हेतुमुपदिशति ।**

– अरूणदत्त

**अपदेशो नाम यत्प्रतिज्ञातार्थसाधनाय हेतुवचनम् ।**

– चक्रपाणि

एखादे विधान करून त्याच्या सिद्धि साठी हेतु वा कारण सांगणे म्हणजे अपदेश होय. 'अमुक अमुक कारणामुळे' असे एखाद्या कार्याचे कारण सांगणे म्हणजे अपदेश तन्त्रयुक्ति होय.

उदा. –

१) मधुर रस स्वभावतःच कफवर्धक असतो. कारण त्यांचे महाभूत संघटन समान असते.

२) जो मृत्युमुखी पडणार आहे, त्याला कोणत्याच औषधापासून जीवितलाभ होत नाही कारण सर्वच रोगांवर उपाय संभवु शकत नाही.

३) वायुपेक्षा जल, जलापेक्षा देश व देशापेक्षा काल यांचा परिहार करणे उत्तरोत्तर दुष्कर आहे; कारण उत्तरोत्तर हे घटक श्रेष्ठ आहेत.

## १२) अतिदेश –

**यत् किञ्चिदेवार्थजातमुक्त्वाऽनुक्तार्थसाधनाय एवमन्यदपि प्रत्येतव्यमिति परिभाषायां स्थापयति ।**

– अरूणदत्त

**अतिदेशो नाम यत्किञ्चिदेव प्रकाश्यार्थमनुक्तार्थसाधनायैव एवमन्यदपि प्रत्येतव्यमिति परिभाष्यते ।**

– चक्रपाणि

एखाद्या विषयासंदर्भात केलेले स्पष्टीकरण दुसऱ्या एखाद्या वर्णन न केलेल्या तत्सदृश अनुक्त विषयासंबंधीसुद्धा योजता येते, असे सांगणे म्हणजे अतिदेश होय. एका ठिकाणी सांगितलेला विधि दुसऱ्या ठिकाणी सुद्धा अध्यहृत धरणे म्हणजे अतिदेश होय.

१) हेमंत ऋतुमध्ये सांगितलेली चर्याच शिशिर ऋतुमध्ये सुद्धा करावी.
२) कर्णशूलनाशक महत् पंचमूलसिद्ध तैलाचा विधि हाच देवदार, कुष्ठ व सरलवृक्षाबाबत सुद्धा करावा.
३) ज्यांचा धर्मशास्त्रामध्ये उल्लेख केला आहे, असे सदाचार हे सुद्धा सद्वृत्तामध्ये समाविष्ट होते.

## १३) अर्थापत्ति –

**अर्थापत्ति नाम योऽन्येनार्थेन उक्तेन ततोऽपरोऽप्यर्थो गदित इव ज्ञायते ।**

– अरूणदत्त

**अर्थापत्ति नाम यदकीर्तितमर्थादापद्यते साऽर्थापत्ति ।**

– चक्रपाणि

वर्णन केलेल्या एका विषयावरून, मुद्यावरून न सांगितलेला दुसरा विषय समजून घेणे म्हणजे अर्थापत्ति होय. अर्थ व आपत्ति असे दोन पदे आहेत. आपत्ति म्हणजे चूकीची/अन्य प्राप्ति. **न सांगितलेल्या अर्थाची प्राप्ति होणे म्हणजे अर्थापत्ति होय.**

उदा. १) 'रात्री दही खाऊ नये' असे वाक्य सांगितल्यावर दिवसा दही खाण्यास हरकत नाही, असा न सांगितलेला अर्थ समजतो
२) मी तांदळापासून बनविलेला भात खाईन, याचा अर्थ तांदळाची यवागु खाणार नाही हा अनुक्त अर्थ अभिप्रेत आहे.



## १४) निर्णय –

**निर्णयो नाम यन्निवारितस्यार्थस्य प्रतिष्ठापनम् ।**

– अरूणदत्त

**निर्णयो नाम विचारितस्यार्थस्य व्यवस्थापनम् ।**

– चक्रपाणि

एखाद्या विषयाचे विविध अनुषंगाने पूर्वी विवेचन करून झाल्यावर त्याविषयासंबंधी नंतर थोडक्यात निर्णयात्मक विचार करून विधान करणे, म्हणजे निर्णय तन्त्रयुक्ति होय.

एखाद्या विषयाचे निश्चयाने पुन्हा वर्णन करणे.

जो विषय विचाराधीन आहे. वा ज्या विषयाचे सर्व अंगांनी निराकरण झाले आहे. त्यासंबंधी निर्णय प्रतिष्ठापित करणे, म्हणजे निर्णय होय. यामुळे त्या विषयाची सिद्धता होते. तसेच एखादा विषय उपस्थित करून, त्याचा पूर्वपक्ष सुसंगरीत्या मांडून नंतर त्यावरील आक्षेप दूर करणे वा त्या पूर्वपक्षातील एखादा मुद्दा निवारित म्हणजे बाजूला पडण्यासारखा असेल, त्याविषयी उत्तर देऊन त्याची प्रतिष्ठापना करणे, याला सुद्धा निर्णय तन्त्रयुक्ति म्हणतात.

उदा.

१) चरक संहितेच्या सूत्रस्थानाच्या ९ व्या खुड्डाक चतुष्पाद अध्यायात भिषक्, द्रव्य उपस्थाता व रूग्ण यांचे प्रत्येकी ४-४ गुणांसह वर्णन केले. व नंतर पुढील १० व्या अध्यायात त्याला 'षोडशकला चिकित्सा' असे पुन्हा वर्णन करून तो विषय प्रतिष्ठित/स्थापित/सिद्ध केला.
२) चिकित्सा व अचिकित्सा ह्यामध्ये फरक आहे, असे निश्चयाने पुन्हा वर्णन करणे.

## १५) प्रसंग –

**प्रसंगो नाम पूर्वाभिहितस्य अर्थस्य केनचित् सम्बन्धान्तरेण पुनरभिधानम् ।**

– अरूणदत्त

**प्रसंगो नाम पूर्वाभिहितस्य अर्थस्य प्रकरणागतत्वादिना पुनरभिधानम् ।**

– चक्रपाणि

पूर्वी वर्णन करून झालेल्या विषयाचेच निराळ्या संदर्भात, वेगळ्या प्रकरण-अधिकरणामध्ये पुन्हा वर्णन करणे. म्हणजे प्रसंग तन्त्रयुक्ति होय.

एखाद्या विषयाचे पुन्हा वर्णन केले, तर 'पुनरूक्ति' हा तन्त्रदोष उत्पन्न होऊ शकतो. परंतु पूर्वी वर्णन केलेला एखादा विषय नवीन प्रकरणामध्ये नव्या संदर्भाने पुन्हा वर्णन केला तर प्रसंग तन्त्रयुक्तिनुसार ती पुनरूक्ति होत नाही.

उदा.

१) चरक संहिता सूत्रस्थान ११ व्या अध्यायात काल, अर्थ व कर्म ह्या त्रिविध आयतनांचे वर्णन केले. त्यानंतर पुन्हा शारीरस्थान प्रथम अध्यायात दुसऱ्या संदर्भाने त्रिविध आयतनांचे पुन्हा वर्णन केले आहे.

२) सुश्रुत संहिता सूत्रस्थान १ ल्या अध्यायात, 'पंचमहाभूते व आत्मा ह्यांच्या संयोगाला पुरूष असे म्हणावे' अशी व्याख्या केली, व त्यानंतर शारीरस्थान अध्याय १ मध्ये पुन्हा त्याचे वर्णन करून हाच चिकित्साधिकृत पुरूष होय, हे सांगितले. अनेकदा, पूर्वी वर्णन केलेला विषय हा पुनरूक्ति म्हणून वर्णन केला जात नाही. तर त्याविषयाचे आणखीन विशेष वर्णन किंवा त्याचे व्यवहार्य स्वरूप किंवा त्याचा वेगळा दृष्टीकोन तेथे अभिप्रेत असतो.

## १६) एकान्त –

**एकान्तो नाम य एकमेव पक्षमव्यभिचारेण श्रयति मान्यम् ।**

– अरूणदत्त

**एकान्तो नाम यदवधारणेनोच्यते ।**

– चक्रपाणि

ज्या वर्णनामध्ये कुठलाही विकल्प किंवा अपवाद असत नाही, असे निश्चयात्मक वर्णन करणे, म्हणजे एकान्त तन्त्रयुक्ति होय. निश्चयात्मक विधान करणे म्हणजे एकान्त होय.

अरूणदत्तांनी ह्या ठिकाणी थोडे वेगळ्या स्वरूपाने वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'एकाच पक्षाचा अव्यभिचारीपणाने म्हणजे निरपवाद रीतिने आश्रय करणे, अन्य कोणताही पक्ष (विचार) न स्वीकारणें, म्हणजे एकान्त.'

उदा. १) त्रिवृत् हे विरेचक आहे.

२) मदनफळ हे वामक आहे.

३) निज व्याधि हे शारीरदोषात्पन्न असतात.



## १७) अनेकान्त / नैकान्त –

**नैकान्तो नाम अन्यतरपक्षानवधारणात् ।**

– अरूणदत्त

**अनेकान्तो नाम अन्यतरपक्षानवधारणम् ।**

– चक्रपाणि

कोणत्याही एका पक्षाचा स्वीकार न करता, एखाद्या विषयाबाबत सर्व घटकांचा विचार करून वर्णन करणे.

एखाद्या विषयाबाबत उद्भवलेल्या कोणत्याही एकाच पक्षाचा निश्चयात्मक स्वीकार न करणे, म्हणजे अनेकान्त होय. अरूणदत्तांनी ह्यास 'नैकान्त' अशी संज्ञा दिली आहे.

कधी असे तर कधी निराळे, म्हणजे एकदा एक प्रकारे तर अन्यत्र अन्य प्रकारे असे अनिश्चित स्वरूपाचे विवेचन करणे, म्हणजे अनेकान्त होय.

उदा.

१) कधी औषध सेवनाचे मृत्यु टळतो तर कधी औषध सेवनाने सुद्धा मृत्यु चुकत नाही.

२) काही आचार्य म्हणतात की, द्रव्य प्रधान आहे, तर काही म्हणतात गुण प्राधान्य आहे, तर काही वीर्य प्राधान्य तर काही विपाक प्राधान्य स्वीकारतात.

३) सर्व म्रियमाण रूग्णांना औषधांमुळे जीवितलाभ होतो असे नाही तर, सर्वच रोगांवर उपचार अवश्य असतातच असेही नाही.

## १८) अपवर्ग –

**अपवर्गो नाम साकल्येन उत्सृष्टस्य यत् पुनः तदेकदेशापकर्षणम् ।**

– अरूणदत्त

**अपवर्गो नाम साकल्येनोद्दिष्टस्य एकदेशापकर्षणम् ।**

– चक्रपाणि

सामान्यतः सांगितलेल्या नियमाचा जो अपवाद असतो, त्याला अपवर्ग असे म्हणतात. एखादा नियम, विधि वा आचरण साकल्याने सांगून नंतर त्याचा अपवाद सांगणे, म्हणजे 'अपवर्ग तन्त्रयुक्ति' होय.

उदा.

१) विषबाधा झालेल्यांना स्वेदन देऊ नये, असा सामान्य नियम सांगून नंतर कीटाची

विषबाधा झालेल्यांना मात्र हा नियम लागू नाही, त्यांना स्वेद द्यावा. असे वर्णन करणे.
२) पर्युषितान्न (शिळे अन्न) खाऊ नये. मात्र मांस, आर्द्रकादि, शुष्क पालेभाज्या, फळे व मोदकादि ह्या नियमास अपवाद आहेत. (च.सू. ८)

## १९) विपर्यय –

**विपर्ययो नाम यथा उपदिष्टविपर्ययेण लक्षणादिकरणम् ।**

– अरूणदत्त

**विपर्ययो नाम अपकृष्टात् प्रतीपोदाहरणम् ।**

– चक्रपाणि

एखादा मुद्दा वा विधि वर्णन करून झाल्यावर त्यावरून त्याच्या विरूद्ध (विपरीत) अशा मुद्दयाचे वा विधिचे ग्रहण करणे, म्हणजे विपर्यय होय.
विरूद्ध उदाहरणाचा थोडक्यात निर्देश करणे. एकदा सांगितलेल्या मुद्दयाच्या विपरित / विरूद्ध प्रकारे लक्षणादिंचा उल्लेख करणे, म्हणजे विपर्यय होय.
उदा.
१) कृश, वृद्ध, दुर्बल व भीत अशा रूग्णांवर चिकित्सा करणे त्रासदायक असते. याचाच अर्थ सुदृढ, बलवान व धीट रूग्णांवर चिकित्सा करणे सोपे असते.
२) व्याधिमध्ये ज्या हेतुंनी व्याधि उत्पन्न झाला आहे, त्या हेतुंच्या सेवनाने व्याधि वाढतो तर त्या हेतुंच्या विपरीत आहारविहाराने सुख प्राप्त होते.
३) योग्य प्रकारे स्नेहन झाल्यावर वाताचे अनुलोमन, अग्नि प्रदीप्त होणे, मलाला स्निग्धता व मृदुता येणे, स्नेहोद्वेग व क्लम ही लक्षणे उत्पन्न होतात. तर रूक्षण योग्य झाल्यावर याच्या विपरित लक्षणे दिसून येतात.
अर्थापत्तिमध्ये सांगितलेल्या वाक्याचा बरोबर विपरित अर्थ निघत नाही, अविरोधी असा दुसरा अर्थ निघतो, तर विपर्ययामध्ये विपरित/विरूद्ध असाच अर्थ निघतो. हा अर्थापत्ति व विपर्यय मधील फरक आहे.

## २०) पूर्वपक्ष –

**पूर्वपक्षो नाम प्रतिज्ञातार्थसंदूषणं वाक्यम् ।**

– अरूणदत्त/चक्रपाणि

ज्याचे प्रतिपादन चालू आहे, अशा विषयाच्या मूळ प्रतिज्ञारूप विधानालाच



आक्षेप घेणारे, त्याला सदोष ठरविणारे वाक्य म्हणजे पूर्वपक्ष होय.

उदा. काही गोष्टी हितकर तर काही अहितकर असतात. ह्या वचनाला आक्षेप घेऊन पूर्वपक्ष मांडला की, काही रूग्ण हितकर सेवन केल्याने बरे होतात. तर काही हितकर सेवनाने सुद्धा मृत्युमुखी पडतात. या उलट काही रूग्ण अहितकर सेवन करून ही व्याधिग्रस्त होत नाहीत, तर काही अहितकर सेवनाने मृत्यु पावतात. यावरून हितकर-अहितकर विवेक हा निरर्थक नव्हे काय? हा पूर्वपक्ष आहे.

## २१) विधान –

**विधानं नाम यत् प्रकरणानुपूर्वं विधानं आवेक्ष्यते ।**

– अरूणदत्त

**विधानं नाम सूत्रकारश्च विधाय वर्णयति ।**
**केचित् तु प्रकरणानुपूर्व्या अर्थाभिधानं विधानम् आहुः ।**

– चक्रपाणि

विशिष्ट क्रमाला अनुसरून प्रकरणातील विषयाची मांडणी करणे म्हणजे विधान होय. एखाद्या प्रकरणामध्ये विषय वर्णन करताना एखादा विशिष्ट क्रम ठरविला असेल तर त्या क्रमाला अनुसरून त्या विषयाची मांडणी करणे, म्हणजे विधान होय.

उदा.
१) रस ते शुक्र ह्या धातूंचा क्रम त्यांच्या उत्पत्तिनुसार निश्चित केल्यानंतर त्यांचे त्याच क्रमाने निर्देश करणे, म्हणजे विधान होय.
२) दोषांचा वात-पित्त-कफ हा क्रम सांगून मग त्यांचे त्याच क्रमाने पुढे वर्णन करणे.

चक्रपाणिंनी 'विधान'चा एक अजून वेगळा अर्थ वर्णन केला आहे.

विशिष्ट अभिप्राय गृहीत धरून तदनुसार जेव्हा एखादा सूत्रकार शब्दयोजना करतो, त्या योजनेला विधान असे म्हणतात.
उदा.
२ अधोभागातील, ७ शिरोभागातील, स्वेदवह स्रोतस व रोमकूपे ही मलायतने दुष्ट म्हणजे क्षीण आणि वृद्ध अशा दोषांमुळे दुषित होतात. ह्या ठिकाणी 'दुष्ट' हे पद विशिष्ट अर्थाने योजले आहे. याला विधान असे म्हणतात.

## २२) अनुमत –

**अनुमतं नाम एकीयमतस्य अनिवारणेन अनुमननम् ।**

– चक्रपाणि

एखाद्या विषयवर्णनामध्ये एखाद्या व्यक्तिच्या किंवा एखाद्या पक्षाच्या मताला खोडून न काढता अनुमती देणे म्हणजे अनुमत होय.

ज्यावेळी एखाद्या विषयाबाबत विविध प्रकारचे विचारप्रवाह मांडले जातात. त्यामध्ये जे योग्य असतील त्यांची मांडणी करून ते खोडून काढले नाहीत, तर ते विचार ग्रंथकर्त्याला मान्य आहेत. त्याची त्या विचारास अनुमती आहे, हे गृहीत धरले जाते.

उदा.

१) ''गर्भ मृत होऊन जर शल्यभूत झाले असेल तर जरायुपातन करावे, असे काहीजण मानतात.'' असे चरकांनी शारीरस्थान ७ मध्ये म्हंटले आहे.

इतरांच्या या मताला न खोडता ते मांडले आहे, म्हणजे त्याला चरकांची अनुमती आहे.

२) काही विद्वान द्विविधवीर्य मानतात. काही विद्वान अष्टविधवीर्य मानतात. तर काही अपरिसंख्येय वीर्य मानतात.

## २३) व्याख्यान –

**व्याख्यानं नाम यत् मादृश्येभ्यः विशिष्टतरबुद्धिगम्यम् ।**

– अरूणदत्त

**व्याख्यानं नाम यत् सर्वबुदध्यविषयं व्याक्रियते ।**

– चक्रपाणि

सर्वांच्याच बुद्धिला आकलन न होणाऱ्या विषयाचे विशिष्ट प्रकारे स्पष्टीकरण करणे, म्हणजे व्याख्यान होय असे चक्रपाणि म्हणतात.

त्रिविध बुद्धिचे लोक असतात. उत्तम, मध्यम, व अधम बुद्धि नुसार लोकांचे प्रकार करता येतात. त्यामध्ये काही विषय हे फक्त असामान्य बुद्धिच्या म्हणजेच उत्तम प्रतिच्या बुद्धिने युक्त अशाच व्यक्तींना समजतात.

तेव्हा सर्वसामान्य व्यक्तींना हे अवघड विषय समजून सांगण्यासाठी त्या विषयाचे स्पष्टीकरण करणे, म्हणजे व्याख्यान होय.

उदा. –



गर्भाच्या मासानुमासिक वृद्धिचे विस्ताराने स्पष्टीकरण केले आहे.

सुश्रुताचार्यांनी थोडे वेगळे वर्णन केले आहे. ते म्हणतात की, आपल्या तन्त्रामध्ये एखाद्या विषयाचे अन्य तंत्रांतील विषयापेक्षा अतिरिक्त म्हणून विशेषत्वाने वर्णन करणे, म्हणजे व्याख्यान उदा. सुश्रुत तंत्रांमध्ये पंचविंशतिक पुरूषाचे वर्णन केले आहे.

## २४) संशय –

**संशयो नाम साकाङ्क्षत्वं अनिश्चितवस्तुविज्ञानम् ।**

– अरूणदत्त

**संशयो नाम विशेषाकांक्षानिर्धारितोभयविषयज्ञानम् ।**

– चक्रपाणि

एखाद्या विषयाबाबत जर काही कारणामुळे दोन किंवा अधिक पक्ष उद्‌भवत असतील, तर त्या दोन्ही पक्षांचे ज्ञान म्हणजे संशय.

विशिष्ट विषयाचे ज्ञान निश्चित स्वरूपात न होणे. त्यामुळे त्या विशिष्ट विषयाबाबत संशय उत्पन्न होते. अशा वेळी 'संशय तन्त्रयुक्ति'चा वापर करून दोन्ही पक्षांबाबत विवेचन करावे लागते.

उदा.

१) जन्माचे कारण काही विद्वान मातापिता मानतात, तर काही स्वभाव किंवा यदृच्छा असे कारण मानतात.

यामुळे ह्या विषयाबाबत संशय उत्पन्न होतो की, याचा निर्णय नक्की कसा करावा.

२) रोगाने दुर्बल झालेल्या एखाद्या मनुष्याचा तो रोग एकाएकी दूर झाला तर त्या व्यक्तीच्या जगण्याविषयी संशयच मानावा.

## २५) अतीतावेक्षण –

याला अरूणदत्तांनी 'अतीतापेक्षण' तर सुश्रुतांनी 'अतिक्रान्तावेक्षण' असे शब्द वापरले आहे.

**अतीतापेक्षणं नाम यदतिक्रान्तमपेक्ष्य प्रस्तुतस्य साधनं उच्यते ।**

– अरूणदत्त

**अतीतावेक्षणं नाम यदतीतमेव उच्यते ।**

– चक्रपाणि

एखादा विषय वर्णन करत असताना, त्याच्या स्पष्टीकरणार्थ मागे वर्णन केलेल्या स्थानातून वा अध्यायातून सूत्राचा संदर्भ घेणे, म्हणजे अतीतावेक्षण होय.

'अतीत' म्हणजे मागे येऊन गेलेले, भूतकाळातील तर 'अवेक्षण' म्हणजे पाहणे, अवलोकन करणे होय.

चिकित्सास्थानातील विषयवर्णनामध्ये सूत्रस्थानातील वा शारीरस्थानातील सूत्राचा संदर्भ घेणे, म्हणजे अतीतावेक्षण.

उदा. –

१) विमानस्थान ५ वा अध्याय, स्रोतोविमानामध्ये धातूंच्या स्रोतसाची दुष्टी लक्षणे ही सूत्रस्थानात २८ व्या अध्यायात वर्णन केलेल्या धातुप्रदोषज विकारांच्या समान असतात.

२) वातज हृद्रोग चिकित्सेत रास्ना, जीवक महास्नेह वापरावा (चिकित्सास्थान ६) यामध्ये महास्नेह म्हणजे काय? ह्या उत्तरासाठी सूत्रस्थान १६ व्या अध्यायातील महास्नेहाचा संदर्भ घ्यावा लागतो.

३) वातव्याधि चिकित्सा अध्यायात वातव्याधिची सम्प्राप्ति समजून घेताना, त्यातील 'रिक्त स्रोतस' हे पद समजण्यासाठी सूत्रस्थान १२ वा अध्याय वातकलाकलीय मधून रिक्त स्रोतस म्हणजे अतिरिक्त रूक्षादि गुणांनी युक्त स्रोतस होय, हे समजून घ्यावे लागते.

## २६) अनागतावेक्षण –

**अनागतावेक्षणं नाम यत् अनागतं विधिं प्रमाणीकृत्यार्थसाधनम् ।**

– चक्रपाणि

अरूणदत्तांनी तन्त्रयुक्तींच्या नाम व संख्येमध्ये 'अनागतापेक्षा' असा उल्लेख केला आहे, परंतु ह्या तन्त्रयुक्तीचे उदाहरणासह वर्णन मात्र आढळत नाही. चरक व चक्रपाणि ह्यांनी मात्र ह्याचे वर्णन केले आहे.

'अनागत' म्हणजे जे अजून आलेले नाही किंवा जे अजून पुढे आहे ते आणि 'अवेक्षा' म्हणजे पाहणे, अवलोकन करणे होय.

एखाद्या विषयाचे वर्णन करतांना पुढे वर्णन केलेल्या एखाद्या विषयाचे वा सूत्राचे संदर्भ घ्यावे लागतात. त्याला अनागतावेक्षण असे म्हणतात.

सूत्रस्थानातील एखाद्या सूत्राचे स्पष्टीकरण करतांना चिकित्सास्थानातील संदर्भ घेणे.

उदा.



१) सूत्रस्थानाचा २४ वा विधिशोणितीय अध्यायात रक्तप्रदोषज विकारांची चिकित्सा करतांना 'तिक्तसर्पि'चा उल्लेख आहे, व ह्या तिक्त सर्पिचा पाठ चिकित्सास्थानाच्या कुष्ठचिकित्सा अध्यायात आहे.

२) मेदोप्रदोषज विकार (च.सू. २८) म्हणजेच प्रमेह पूर्वरूपे होय. (च.चि. ६)

## २७) स्वसंज्ञा –

**स्वसंज्ञा नाम या तन्त्रकारैः स्वतन्त्रसंव्यवहारार्थं प्रणीज्ञा सती परतन्त्रेषु न व्यवहरति ।**

– अरूणदत्त

**स्वसंज्ञा नाम या तन्त्रकारैः व्यवहारार्थं संज्ञा क्रियते ।**

– चक्रपाणि

तंत्रकर्त्याकडून शास्त्राच्या व्यवहारासाठी काही शास्त्रानुरूप विशिष्ट संज्ञा निर्माण केल्या जातात व प्रचलित केल्या जातात. त्यास स्वसंज्ञा म्हणतात.

त्या त्या शास्त्राच्या स्वतःच्या काही संज्ञा, काही परिभाषा असतात व त्या शास्त्रांच्या विषयानुसार त्या संज्ञांचा अर्थ घ्यावा लागतो, ह्यास स्वसंज्ञा असे म्हणतात.

ह्या संज्ञांचा त्याच अर्थाने अन्यशास्त्रामध्ये वापर करता येत नाही.

उदा. –

१) 'दोष', धातु, मल ह्या संज्ञा आयुर्वेद शास्त्राच्या स्वतःच्या संज्ञा आहेत. धातु ह्याचा अर्थ आयुर्वेदामध्ये शरीरधारण करणारे घटक असा होतो, तर अन्यशास्त्रात धातु ह्याचा अर्थ खनिज पदार्थ, Metals असा होतो.

२) संस्कृतमध्ये मिथुन म्हणजे दोघांची जोडी असा होतो, तर आयुर्वेदामध्ये घृत व मध ह्यांच्या संयोगाला मिथुन असे म्हणतात.

३) 'रस' ह्या शब्दाचे विभिन्न अर्थ आहेत. जसे – चव, आद्यधातु, आहाररस, पारद, द्रव्यातील व्यक्तभाव, मांसरस, स्वरस इ. त्या त्या शास्त्राप्रमाणे रस पदाचा अर्थ घेऊन मग विषयवर्णन करावे.

## २८) ऊह्य –

**ऊह्यं नाम यद् अप्रतिबद्धं ग्रन्थे स्वयं प्रज्ञया तर्कयित्वा योज्यम् ।**

– अरूणदत्त

**ऊह्यं नाम यदनिबद्धं ग्रन्थे प्रज्ञया तर्क्यत्वेनोपदिश्यते ।**

– चक्रपाणि

जो विषय ग्रंथामध्ये प्रत्यक्ष वर्णन केलेला नाही, तरीही स्वतःच्या बुद्धिने त्या विषयाचे वा विषयांशाचे प्रतिपादन करून घ्यावे लागते, त्यास ऊह्य असे म्हणतात. काही वेळेला एखाद्या विषयाचे प्रत्यक्ष वर्णन ग्रंथामध्ये केलेले नसते, तरीही बुद्धिचा वापर करून (ऊहन करून) त्याचा गर्भितार्थ समजून घ्यावा लागतो.

उदा.

१. महाकषाय अथवा गणांमध्ये वर्णन केलेल्या द्रव्यांपैकी एखादे द्रव्य अवस्था, ऋतु, वय इ. नुसार अयौगिक ठरत असेल तर त्याचा समावेश योगामध्ये करू नये तसेच एखादे द्रव्य प्रत्यक्ष गणामध्ये वर्णन केलेले नाही तरीही, जर ते द्रव्य अवस्थेनुसार कार्य करीत असेल तर त्याचा समावेश गणामध्ये करावा.
है वैद्याने स्वतःच्या बुद्धिनुसार ठरवावे.
२. शोधन कर्म कोणाला करावे व कोणाला करू नये, ह्याबाबत अवस्थांचा विस्ताराने विचार केलेला आहे. उदा. गुल्म, हृद्रोगामध्ये वमन करू नये. मात्र गुल्म, हृद्रोगामध्ये उत्क्लेश, गौरव इ. अवस्था उत्पन्न झाली तर वमनकर्म करावे.
३. कुष्ठामध्ये बस्तिकर्म करू नये, मात्र कुष्ठात बस्तिद्वारे साध्य अवस्था उत्पन्न झाली तर अवश्य बस्तिकर्म करावे.

## २९) समुच्चय –

**च समुच्चिनोति**

– अरूणदत्त

**इदं वेदं चेति समुच्चयः ।**

– सुश्रुत

**समुच्चयो नाम यत् इदं च इदं च इति कृत्वा विधीयते ।**

– चक्रपाणि

'अमुक आणि अमुक', 'हे आणि ते' याप्रमाणे एकसारख्याच घटकांचा एकवर्गीय वा समुदायात्मक वर्णन करणे म्हणजे समुच्चय तन्त्रयुक्ति होय. अनेक गोष्टींचा उल्लेख एकत्र करणे म्हणजे समुच्चय होय.

अनेकदा 'च' ह्या पदाने समुच्चय तन्त्रयुक्तिचा बोध करून घ्यावा लागतो. संहितेच्या रचना पद्धतिनुसार कमीत कमी शब्दात वर्णन करावे लागते, त्यावेळी एका



घटकाचे वर्णन करून पुढे 'च' कार लिहिलेला असतो, त्यावरून अनुक्त अशा तत्समान इतर घटकांचा बोध करून घ्यावा लागतो.

उदा.

१. शुष्कं च आदौ च । – च.सू. २६

रसाची व्याख्या करताना द्रव्याचा जिव्हा अधिष्ठानाशी संयोग झाल्यास, शुष्क द्रव्यामध्ये जी चव आधी सर्वप्रथम लागेल, त्याला रस म्हणजे

ह्यामध्ये 'च' काराने 'शुष्कं च' ने 'आर्द्र च' म्हणजे शुष्काबरोबर आर्द्रद्रव्याला सुद्धा हा नियम लागू होतो. तसेच 'आदौ च' ने 'आदौ अन्ते च' असा बोध घेऊन द्रव्याची शेवटची चव हाच सुद्धा रस असतो, हे समजते.
२. वर्णश्च स्वरश्च । वर्ण आणि स्वर हा समुच्चय आहे.

## ३०) निदर्शन –

**निदर्शनं नाम यत् निदर्शयितव्यं सूक्ष्ममपि अर्थं स्वधर्मसादृश्यात् स्पष्टीकरोति आदर्श इव मुखविधुम् ।**

– अरूणदत्त

**निदर्शनं नाम मूर्खविदुषां बुद्धिसाम्यविषयो दृष्टान्तः ।**

– चक्रपाणि

दृष्टान्त म्हणजे उदाहरण. उदाहरणाच्या साहाय्याने अविवेचनीय असा सूक्ष्म गूढ विषय देखिल स्वधर्मसादृश्यामुळे स्पष्ट करून सांगितला जातो, त्यास निदर्शन असे म्हणतात.

मात्र हा दृष्टान्त मूर्ख व विद्वान अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींना समजला पाहिजे.

उदा.

१. जे औषध योजावयाचे ते चिकित्सकाला पूर्णपणे ज्ञात पाहिजे, म्हणजे ते अमृताप्रमाणे कार्य करते.

२. ज्याप्रमाणे वायूच्या साहचर्याने एखाद्या गवताळ प्रदेशातील अग्नि अधिकच वाढतो, त्याप्रमाणे व्रण सुद्धा निज दोषांनी दुष्ट झाला म्हणजे अधिकच वाढतो.

## ३१) निर्वचन –

**निर्वचनं नाम निर्णयार्थं वचनं निरूक्तम् ।**

– अरूणदत्त

**निर्वचनं नाम पण्डितबुद्धिगम्यो दृष्टान्तः । किं वा निर्वचनं निरूक्तिः ।**

– चक्रपाणि

निर्वचन तन्त्रयुक्तिचे दोन प्रकारे अर्थविवरण मिळते.

१) निर्वचन म्हणजे निरूक्ति वा शब्दाची व्यूत्पत्ति होय. एखाद्या संज्ञेतील अभिप्रायाचा निर्णय होण्यासाठी, त्यातील अर्थ स्पष्ट होण्यासाठी, सांगितलेली निरूक्ति म्हणजे निर्वचन होय. उदा. a) ज्याला पाहून जग विषण्ण झाले, ते विष होय.

b) विविधं सर्पति यतो विसर्पः । जो इकडेतिकडे पसरतो, तो विसर्प

२) केवळ विद्वानांच्या बुद्धिलाच समजेल, आकलन होईल असा दृष्टान्त देणे म्हणजे निर्वचन होय.

उदा.

उत्पन्न होणारी प्रत्येक वस्तु क्षणिकत्वामुळे नाश पावतच असते, परंतु त्यांच्या नाशाचे कारण समजु शकत नाही कारण ते मूळातच अस्तित्वात नसतात. नित्य गमनशील म्हणजे नश्वर असणाऱ्या काळाच्या विनाशाचे कारण जसे समजू शकत नाही, तसेच हे आहे.

## ३२) संनियोग/नियोग –

**नियोगो नाम यो यस्यानुष्ठेयः ।**

– अरूणदत्त

**नियोगो नाम अवश्यानुष्ठेयतया विधानम् ।**

– चक्रपाणि

हे असेच करावे, अशा प्रकारचे सांगणे. अवश्य आचरणीय म्हणून एखादी गोष्ट सांगणे म्हणजे नियोग होय. अमुक एखादी गोष्ट एखाद्याला एखाद्या प्रसंगी सांगणे, त्याचे अनुष्ठान करण्यास सांगणे म्हणजे नियोग होय. चरकांनी संनियोग पद योजले आहे तर इतर सर्व ग्रंथकार–टीकाकारांनी नियोग पद योजले आहे.

उदा. १) उष्णोदकोपचारी स्यात् । स्नेहपानामध्ये सर्वत्र गरम पाण्याचाच वापर करावा.

२) जेन्ताक स्वेदप्रकारात स्वेद व मूर्च्छा इ. लक्षणे उत्पन्न झाली तरी पिण्डिका (ओटा) सोडू नये.

३) पथ्यकरच भोजन करावे.



## ३३) विकल्पन/विकल्प –

**विकल्पो नाम विविधं कल्पनं इदं कार्यं इदं वा कार्यम् ।**

– अरूणदत्त

**विकल्पः पाक्षिकाभिधानम् ।**

– चक्रपाणि

विकल्प म्हणजे अमुक करावे वा अमुक करू नये असे विविध प्रकारे केलेले कथन. हे किंवा ते असे सांगणे म्हणजे विकल्प किंवा विविध प्रकारे केलेले कथन म्हणजे विकल्प होय.

चक्रपाणि म्हणतात विकल्प म्हणजे पाक्षिक वर्णन. पक्ष म्हणजे बाजू होय. विकल्पात दोन्ही बाजू सांगितल्या जातात.

चरकांनी विकल्पन शब्द वापरला असून चक्रपाणि व अरूणदत्त यांनी विकल्प शब्द वापरला आहे.

उदा. १) शोष झालेल्या रूग्णाने जांगल प्राण्यांच्या मांसरसाबरोबर तांदुळ इत्यादींचे सेवन करावे किंवा बकरीचे वा मेंढीचे तूप यवागुबरोबर प्यावे.

२) सारोदक प्यावे किंवा कुशोदक प्यावे.

३) ज्वराच्या पूर्वरूपामध्ये लघुअशन करावे किंवा अपतर्पण करावे.

## ३४) प्रत्युत्सार –

**प्रत्युत्सारो नाम यत्रोपपत्तिं दर्शयन्तः परस्परमतानि निवारयन्ति ।**

– अरूणदत्त

**प्रत्युत्सारो नाम उपपत्त्या परमतनिवारणम् ।**

– चक्रपाणि

दुसऱ्याचे मत उपपत्तीपूर्वक खोडून काढणे म्हणजे प्रत्युत्सार होय. संहितांमध्ये अनेक विषयांबाबत संभाषांच्या द्वारे विवरण केलेले आढळते. त्यामध्ये उपपत्तीद्वारा म्हणजे तार्किक कारणांद्वारे दुसऱ्याचे मत खोडून काढलेले आढळते, याला प्रत्युत्सार म्हणतात. उदा. १) शरीरात दात व नखे धरून एकूण ३६० अस्थि आहेत मात्र धन्वन्तरी संप्रदायामध्ये ३०० अस्थिंचे वर्णन केलेले आहे.

२) रससंभाषेमध्ये अनेक ऋषींनी परस्परांची मते खोडून स्वतःचे मत प्रस्थापित केले आहे. मात्र हे करतांना दुसऱ्याच्या मताला नावे न ठेवता उपपत्ती (तर्क) द्वारा

योग्य मार्गाने परमत खोडून काढले आहे.

### ३५) उद्धार –

**उद्धारो नाम शास्त्रारम्भप्रत्याख्यानादिचोद्यस्य समाधानम् ।**

– अरूणदत्त

**उद्धारो नाम परपक्षदूषणं कृत्वा स्वपक्षोद्धरणम् ।**

– चक्रपाणि

चक्रपाणि म्हणतात उद्धार म्हणजे दुसऱ्याच्या पक्षातील दोष दाखवून स्वपक्षाचे समर्थन करणे उदा. ज्या महाभूतादि तत्त्वांच्या गुणसंपन्नतेतून पुरूषाची उत्पत्ती होते त्याच तत्त्वांच्या वैगुण्यापासून विविध व्याधींची उत्पत्ती होते.

अरूणदत्तांनी उद्धार तंत्रयुक्तीचे थोडे वेगळे वर्णन केले आहे. ते म्हणतात. 'शास्त्राच्या प्रारंभाविषयी म्हणजे मूल भूमिकेविषयी उपस्थित केलेल्या आक्षेपादि प्रश्नांचे समाधान करणे.

उदा. अग्निवेशांनी चिकित्साशास्त्रावरच मूलगामी आक्षेपमूलक प्रश्न केला की, 'चिकित्सा केली तर रूग्ण बरा होतो किंवा चिकित्सा करूनही मृत्यु पावतो. चिकित्सा न करताही रूग्ण बरा होतो किंवा चिकित्सा न केल्याने मृत्यु होतो, तर मग चिकित्सा – अचिकित्सा यात काही फरक आहे का?'

### ३६) सम्भव –

**सम्भवो नाम उपपत्तिर्यस्मिन् उपपद्यते अनुपदिष्टे ।**

– अरूणदत्त

**संभवो नाम यत् यस्मिन् उपपद्यते स तस्य संभवः ।**

– चक्रपाणि

चक्रपाणि म्हणतात, जे ज्या ठिकाणी उपपन्न ठरू शकते, त्याला त्याचा संभव असे म्हणतात.

उदा. पिप्लु, व्यंग, नीलिका आदि क्षुद्र विकार मुखाच्या ठिकाणी होतात, म्हणून मुख हे ह्या विकारांचे संभव आहे.

विकारांबद्दल चिकित्सादि विचार करीत असताना त्यांच्या उत्पत्तिस्थानाचा निर्देश केलेला नसताना सुद्धा त्यांच्या स्वरूपावरूनच ते उपपन्न होऊ शकते. एखाद्या गोष्टीचा विशिष्ट ठिकाणी उल्लेख केला नसतानाही तेथील त्या गोष्टीची उपस्थिती संभाव्य धरणे ह्या तत्त्वावर उभारलेली उपपत्ति वा तेथील योजना हीच संभव तन्त्रयुक्ति होय.



अरूणदत्त म्हणतात एखाद्या ठिकाणी एखाद्या मुद्याबद्दल काही सांगितलेले नसताना तेथे तो उपपत्तीपूर्वक उपपन्न होणे, म्हणजे संभव होय.

उदा. दूषित रक्त निघून गेले म्हणजे लगेच लालिमा, वेदना यांचा उपशम होतो.

विशिष्ट उपपत्ति अथवा तिची विशिष्ट ठिकाणी केलेली योजना म्हणजे संभव तंत्रयुक्ति होय. यामध्ये उपपत्तिला अधिक महत्त्व असते.

---

## भट्टारक हरिश्चन्द्रोक्त तन्त्रयुक्ति –

या ३६ तन्त्रयुक्तींच्या व्यतिरिक्त आणखी ४ तन्त्रयुक्तींचे वर्णन चरक संहितेचे टीकाकार भट्टारक हरिश्चन्द्र यांनी केले आहे. (एकूण ४० तन्त्रयुक्ति) त्यांचा समावेश चक्रपाणींनी पुढील तन्त्रयुक्तींमध्ये केला आहे. त्यामुळे त्यांचे वेगळे वर्णन चक्रपाणींनी केलेले नाही.

| | | |
|---|---|---|
| परिप्रश्न | – | उद्देश |
| व्याकरण | – | व्याख्यान |
| व्युत्क्रान्ताभिधान | – | निर्देश |
| हेतु | – | प्रत्यक्षादि प्रमाण |

### परिप्रश्न –

**नाम अज्ञातस्यान्तेवासिनः तत्वज्ञानार्थं उचितः प्रत्यनुयोगः ।**

– भट्टारहरिश्चद्र टीका

शिष्याला जे ज्ञात नाही, त्या तत्वाच्या ज्ञानासाठी त्याने आचार्यांना त्या तत्वासंबंधी परिप्रश्न विचारणे, यातून त्या विषयाधिकरणाचा बोध होतो.

उदा. – भगवल्लङ्घनं किंस्विल्लङ्घनीयाश्च किदृशाः । – च.सू. २१/६

**व्याकरण –**

**नाम तस्यार्थवर्णनम् ।**

**– भट्टारहरिश्चद्र टीका**

**शिष्याने विचारलेल्या प्रश्नाचे त्याच्या तत्वबोधार्थ तद् विषयार्थाचे विवरण/ व्याख्यान करणे.**

उदा. यात्किंश्चिल्लाघवकरं देहे तल्लङ्घनं स्मृतम् ।

**व्युत्क्रान्ताभिधान –**

**नाम यत् सूत्रान्तरे पदम्–अर्थक्रमादनुच्चार्य्यान्तरान्यतरविधानि पदानि कृत्वा पश्चात् तत्पदं पठति ।**

– भट्टारहरिश्चद्र टीका

सूत्रान्तरामध्ये पद वा पदाचा अर्थ यांचे क्रमाने उच्चारण करून मग त्यांचा अन्वय करून निर्देश करणे.

**हेतु –**

**हेतुः तु प्रमाणानि । हेतुः नाम उपलब्धिकारणं तत्प्रत्यक्षमनुमानमुपमानमैतिह्यमौपम्यमिपि (च.वि. ८/३३) ।**

– भट्टारहरिश्चद्र टीका

हेतु म्हणजे उपलब्धि कारण म्हणजेच प्रमाण.



| **विषय** | **ग्रंथकार** | **संदर्भ** |
|---|---|---|
| तन्त्रनिरूक्ति | डल्हण<br>अरूणदत्त | सु.उ. ३५/१<br>अ.हृ.सू. १/३<br>अ.हृ.उ. ४०/७८ |
| तन्त्रगुण | चरक<br>अरूणदत्त | च.वि. ८<br>अ.हृ.उ. ४० |
| तन्त्रदोष | चक्रपाणि<br>अरूणदत्त | च.सि. १२/६८०<br>अ.हृ.उ. ४०/७८ |
| तन्त्रयुक्ति निरूक्ति | चक्रपाणि<br>डल्हण | च.सि. १२/६८<br>सु.उ. ६५/१ |
| तन्त्रयुक्ति प्रयोजन | चरक<br>सुश्रुत<br>वाग्भट<br>अरूणदत्त | च.सि. १२<br>सु.उ. ६५<br>अष्टांगसंग्रह उ. ५०<br>अ.हृ.उ. ४०/७८ |
| तन्त्रयुक्ति संख्या | चरक<br>सुश्रुत<br>वाग्भट<br>अरूणदत्त | च.सि. १२<br>सु.उ. ६५<br>अष्टांगसंग्रह उ. ५०<br>अ.हृ.उ. ४० |
| तन्त्रयुक्ति नावे | चरक<br>सुश्रुत<br>वाग्भट<br>अरूणदत्त | च.सि. १२<br>सु.उ. ६५<br>अष्टांगसंग्रह उ. ५०<br>अ.हृ.उ. ४० |
| तन्त्रयुक्ति लक्षणे व उदाहरणे | सुश्रुत<br>चक्रपाणि<br>अरूणदत्त | सु.उ. ६५<br>च.सि. १२/६७<br>अ.हृ.उ. ४०/७८ |
| फलश्रुती | चरक<br>सुश्रुत | च.सि. १२<br>सु.उ. ६५ |

# व्याख्या

व्याख्या या सुद्धा तन्त्रगुण आहेत. व्याख्या म्हणजे स्पष्टीकरण गूढ, दुर्बोध अर्थ सोप्या भाषेत, स्पष्ट दृष्टांतासह, सुगम, सुबोध करणे म्हणजे व्याख्या, व्याख्येमुळे तंत्राची गुणवत्ता वाढते.

**व्याख्या अपि तन्त्रस्य गुणः । ताभिरपि तन्त्रमलङ्क्रियते ।**
**ताश्च पंचदशप्रकाराः । तद्यथा, पिण्डपदपदार्थाधिकरणप्रकरणार्थ–कृच्छ्रफलोच्चितकन्यासप्रयोजनानुलोमप्रतिलोमातिसूत्रसमस्त व्याख्याः ।**

| क्र. | अरूणदत्तोक्त व्याख्या | क्र. | अरूणदत्तोक्त व्याख्या |
|---|---|---|---|
| १ | पिण्डव्याख्या | ९ | उच्चितकव्याख्या |
| २ | पदव्याख्या | १० | न्यासव्याख्या |
| ३ | पदार्थव्याख्या | ११ | प्रयोजनव्याख्या |
| ४ | अधिकरणव्याख्या | १२ | अनुलोमव्याख्या |
| ५ | प्रकरणव्याख्या | १३ | प्रतिलोमव्याख्या |
| ६ | अर्थव्याख्या | १४ | अतिसूत्रव्याख्या |
| ७ | कृच्छ्रव्याख्या | १५ | समस्तव्याख्या |
| ८ | फलव्याख्या | | |
| (अ.हृ. उत्तरस्थान – ४० – सर्वाङ्गसुंदर व्याख्या) | | | |

## १) पिण्डव्याख्या –

**पिण्डव्याख्या नाम संक्षेपतया सूत्ररूपेणाध्यायादीनां व्याख्या ।**

पिण्ड म्हणजे एकत्रीकरण, संक्षेपाने, सूत्ररूपाने, अध्याय इत्यादींची व्याख्या म्हणजे पिण्डव्याख्या.

उदा. रिष्टरूप अनेक लक्षणे सांगण्यापूर्वी रिष्ट म्हणजे काय याचे लक्षण दिले आहे. रूप, इंद्रिय, स्वर, छाया इत्यादी प्राकृत भावांमध्ये अनिमित्त (हेतू नसतांना) विकृती निर्माण होणे म्हणजे रिष्ट, या लक्षणाने संपूर्ण रिष्टाध्याय संक्षेपतः सांगून झाला.



## २) पदव्याख्या –

**पदव्याख्या नाम यत्पदानां छेदं कृत्वोच्चारणम् ।**

पदांचा छेद करून सांगणे म्हणजे पदव्याख्या.

उदा. – अथ अतः आयुष्कामीय अध्यायं वि आ ख्यास्यामः असा उच्चार करणे.

## ३) पदार्थव्याख्या –

**पदार्थव्याख्या नाम तेषामेव पदानां विवरणम् ।**

यथा – अथशब्द आनन्तर्ये अधिकारे वा, अतःशब्दो हेतावित्यादि । पदच्छेद करून उच्चारलेल्या पदांचे अर्थासह विवेचन करणे. उदा. अथ शब्द आनन्तर्य किंवा अधिकार दर्शवतो. अतः शब्द हेतु दर्शवतो इत्यादि.

## ४) अधिकरणव्याख्या –

**अधिकरणव्याख्या नाम यद्वस्तुप्रकृतमारभ्य तदनुषङ्गेण व्याख्यानमारभ्यते ।**

अध्यायाचा मुख्य विषय म्हणजे अधिकरण. त्याचे विस्ताराने विवेचन करणे म्हणजे अधिकरण व्याख्या. उदाहरणार्थ प्रत्येक दिवशी करण्याचे आचरण हा दिनचर्या अध्यायाचा विषय आहे. पूर्ण अध्यायात दिनचर्येचे विवेचन आहे. (अ.हृ.सू. २)

## ५) प्रकरणव्याख्या –

**प्रकरणव्याख्या नाम यस्मिन्नर्थे सूत्रे वा प्रकृतेनाप्रकृतं साध्यते ।**

एका विषयाचा उल्लेख करून त्याचे विवेचन पूर्वी वर्णन केलेल्या विषयाप्रमाणे आहे असे जाणावे, असे सांगितले जाते, त्याला प्रकरण व्याख्या म्हणतात.

उदा. – त्रिलवण चूर्णाचे गुण वर्णन करून नंतर अभयाख्य चूर्णाचे गुण त्रिलवण चूर्णाप्रमाणे जाणावे असे म्हटले आहे.

## ६) अर्थव्याख्या –

**अर्थव्याख्या नाम यत्र प्रकरणे सूत्रे वा स्वभावस्योपवर्णनं क्रियते ।**

एखाद्या विषयाचा अर्थ सांगून त्या अर्थाचे विस्ताराने वर्णन करणे. उदा.

'प्रकृतिरूच्यते स्वभावः' या सूत्राने प्रकृती म्हणजे स्वभाव असा अर्थ सांगितला आहे.

'स पुनराहारौषधद्रव्याणां स्वाभाविको गुर्वादिगुणयोगः ।' 'स्वभाव म्हणजे आहारद्रव्ये आणि औषधी द्रव्ये यांचा स्वभाविक गुर्वादिगुणसंयोग' असे स्वभावाचे वर्णन करून 'माषमुद्गयोः शूकरैणयोश्च ।' माष (गुरू), मुद्ग (लघु) अशी उदाहरणे दिली आहेत.

## ७) कृच्छ्रव्याख्या –

**कृच्छ्रव्याख्या नाम यत्र लेशतः उक्तानामविस्पष्टानां प्रकरणे सूत्रे वा अर्थानां यत्नतः उद्भावनं क्रियते ।**

– कष्टाने कळणाऱ्या अर्थाचे विवेचन म्हणजे कृच्छ्रव्याख्या.

उदाहरणार्थ – 'अनुयायात्प्रतिपदं सर्वधर्मेषु मध्यमाम् ।' सर्व धर्मांमध्ये मध्यममार्गाचा अवलंब करावा असे संक्षेपाने सांगणाऱ्या तंत्रकाराला असे अभिप्रेत आहे की हेतु, लिंग, औषध इत्यादी सर्व ठिकाणी मध्यममार्ग अवलंबावा. (अ.हृ.सू. २।३०)

## ८) फलव्याख्या –

**फलव्याख्या नाम यत्र वस्तुनि बहुष्विनिश्चितार्थष्वेकीयमतेषु प्रस्तुतेषु वस्तुसारभूतं स्वमतं स्वमर्थमुपनिक्षिप्यैकीयमतानि तस्मिन्नेव स्वमतेऽन्तर्भावं नयति ।**

एखाद्या विषयासंदर्भात विविध मते सांगून शेवटी साररूपाने आपले मत सांगितले जाते आणि इतर सर्व मतांचा आपल्या मतात अंतर्भाव होतो असे दाखवले जाते. उदाहरणार्थ निरूहाच्या मात्रेविषयी, १२ प्रसृत निरूह द्यावा, स्नेह आणि मध प्रत्येकी तीन पल घ्यावा अशी मते सांगून आपले मत सांगितले आहे की दोष, औषध इत्यादीच्या बलाच्या सापेक्ष यातील योग्य ते करावे. निरूहाच्या सम्यक् योगाची लक्षणे दिसेपर्यंत निरूह द्यावा. (अ.हृ.सू. १९/४४)

## ९) उच्चितकव्याख्या

**उच्चितकव्याख्या नाम यस्मिन् सूत्रे निदर्शनभूतान्युदाहरणानि तत्रान्तः समाकृष्यार्थः शस्यते । (उदा. – अ.हृ.सू. १/१३)**



निदर्शनार्थ दिलेली उदाहरणे सांगून त्या आधारे आपला विषय मांडला जातो. उदाहरणार्थ पृथिव्यादींना महाभूते म्हणतात. रसादींना धातुसंज्ञा दिली आहे. रसासृङ्मांसमेदोऽस्थिमज्जाशुक्राणि धातवः ।' असे सांगून नंतर विषय मांडला आहे की 'परस्परोपसंस्तम्भाद्धातुस्नेहपरंपरा' (अ.हृ.शा. ३/६५) या सूत्रात महाभूतांनासुद्धा धातू म्हणायचे का?

## १०) न्यासव्याख्या –

**न्यासव्याख्या नाम यस्मिन्नधिकारे वर्तमाने तेनाधिकारणार्थेन सहितं सम्बन्धमभिवीक्ष्यान्यस्यार्थो विनिक्षिप्यते । उदा. – (अ.हृ.उ. ४०/६०), (अ.हृ.उ. ४०/६३), (अ.हृ.उ. ४०/७५)**

एखादा विषय वर्णन करतांना त्याच्याशी संबंधित अन्य विषय वर्णन करणे.

## ११) प्रयोजनव्याख्या –

प्रयोजनव्याख्या नाम, – यत्सूत्रमभिधीयमानं स्वार्थस्य निष्पत्तौ निमित्तभावमुपैति । उदा. (अ.हृ.शा. ३/३३)

एखाद्या विषयकथनाचे प्रयोजन, हेतु, उद्दिष्ट वर्णन करणे. उदाहरणार्थ – सिरांचे विस्ताराने विवेचन शारीरस्थानात येते. अवेध्य सिरा कोणत्या हे कळण्यासाठी ते सिराविवेचन आहे असे त्याचे प्रयोजन ग्रंथकाराने सांगितले आहे.

**अस्याग्रे यथाक्रमं वर्ण्यमानोऽनुलोमप्रतिलोमातिसूत्रसमस्तव्याख्यादीनां विवरणात्मको ग्रन्थो लिखितमुद्रितेषु केषुचिदपि हृदयटीकापुस्तकेषु नोपलभ्यते ।**

उपरोक्त १ ते ११ तंत्रगुणाचे वर्णन ग्रंथात उपलब्ध आहे. परंतु अनुलोम, प्रतिलोम, अतिसूत्र, समस्त या व्याख्या किंवा तंत्रगुणाचे वर्णन ग्रंथात उपलब्ध नाही.

यापुढील अनुलोम, प्रतिलोम, अतिसूत्र व समस्त ह्या व्याख्यांचे वर्णन अरूणदत्त टीकेमध्ये उपलब्ध नाही. परंतु इतर शास्त्रातील तन्त्र व्याख्या व भाष्य यांच्या आधारे आपण त्याचे विवरण करू शकतो.

### १२) अनुलोम व्याख्या –

पूर्वभागाकडून अनुलोमतः उत्तर भागाकडे क्रमशः विषय वर्णन करणे, याला अनुलोम व्याख्या म्हणतात.

उदा. घृत, तैल, वसा, मज्जा हे चतुर्विध स्नेह उत्तरोत्तर गुरू आहेत.

### १३) प्रतिलोम व्याख्या –

प्रतिलोमशः उत्तर भागाकडून पूर्व भागाकडे क्रमशः विषय वर्णन करणे, याला प्रतिलोम व्याख्या असे म्हणतात.

उदा. अम्ल, कटु, तिक्त हे रस पूर्वोत्तर गुरू आहेत.

### १४) अतिसूत्र व्याख्या –

स्थान वा अध्याय संपल्यावर त्याचा उपसंहार करणे, म्हणजे अतिसूत्र व्याख्या होय.

उदा. समाप्यते स्थानमिदं हृदयस्य रहस्यवत् ।

**अत्रार्थाः सूत्रिताः सूक्ष्माः प्रत्यन्यंतेहि सर्वतः ।। अ.हृ.सू. ३०**

सूत्रस्थानाच्या शेवटच्या अध्यायाच्या अन्तिमतः हे उपसंहाराचे सूत्र आहे, अशा प्रकारचे वर्णन करण्यास अतिसूत्र व्याख्या असे म्हणतात.

### १५) समस्त व्याख्या –

ग्रंथातील मूळ विषय सोडून तद् शास्त्र संबंधीत इतर विषयाचे वर्णन असलेले संपूर्ण स्थान ग्रंथास जोडणे, याला समस्त व्याख्या असे म्हणतात. उदा. सुश्रुत संहिता ही शल्यतंत्र प्रधान संहिता आहे. त्यामध्ये शल्यतन्त्राचा विषय सोडून अन्य शालाक्य, काय, बाल, ग्रह इ. विषयांचे वर्णन असलेले उत्तरतन्त्र हे सुश्रुत संहितेस जोडले गले.



## तन्त्रदोष

**तन्त्रदोष – 'दूषयति तन्त्रमिति तंत्र दोषः ।'**

जे सूत्र, भाव, पद तंत्राला दूषित करतात त्यांना तंत्रदोष म्हणतात.

अष्टांग हृदय ग्रंथाचे टीकाकार अरूणदत्त यांनी उत्तरस्थानाच्या ४० व्या अध्यायात तंत्रदोषांचे वर्णन केले आहे. ग्रंथाची रचना करताना ते तंत्रदोषापासून मुक्त असावे.

### तंत्रदोष नावे व संख्या –

| आचार्य विश्वनाथ यांचे मतानुसार (संख्या ५) | महर्षि चरक यांचे मतानुसार (संख्या ५) | आचार्य अरूणदत्त यांचे मतानुसार (संख्या १५) |
|---|---|---|
| पद दोष | न्यूनअर्थ | अप्रसिद्धशब्दम् |
| पदांश दोष | अधिकअर्थ | दुःप्रणीतम् |
| वाक्य दोष | अनर्थक | असङ्गतार्थम् |
| अर्थ दोष | अपार्थक | असुखारोहि पदम् |
| रस दोष | विरूद्ध | विरूद्धम् |
| | | अतिविस्तृतम् |
| | | अतिसंक्षिप्तम् |
| | | अप्रयोजनम् |
| | | भिन्नक्रमम् |
| | | संदिग्धम् |
| | | पुनरूक्तम् |
| | | निःप्रमाणम् |
| | | असमाप्तार्थम् |
| | | अनर्थक / अपार्थकम् |
| | | व्याहतम् |

तंत्रदोष ज्ञानाची आवश्यकता –

**'दुर्लक्षणं विहीनत्वमङ्गानामपि भूषणम् ।**
**इत्यलङ्कारसम्बन्धाद् दोषविज्ञानमीयते' ।।**

(शरीरामध्ये) कुठलेही अशुभ लक्षण किंवा सदोषता नसणे हे सुद्धा शरीरासाठी भूषणावह आहे. अशा या अलंकार स्वरूपत्वानुसार, कुठल्याही तंत्राच्या / शास्त्राच्या दोषांचे ज्ञान हे महत्त्वाचे व आवश्यक ठरते.

## आचार्य अरूणदत्तोक्त तंत्रदोष –

**अप्रसिद्धं दुःप्रणीतमसुखारोदृयसङ्गतम् ।**
**विरूद्धमतिविस्तारमतिसङ्क्षिप्तमेव च ।**
**सन्दिग्धं पुनरूक्तं च निष्प्रमाण निष्प्रयोजने ।**
**असमाप्ताक्षरं तद्वत व्याहतं स्यादपार्थकम् ।**

### १) अप्रसिद्धशब्दम् –

**अप्रसिद्धशब्दं नाम – यल्लोके नातीव प्रसिद्धम् ।**

समाजात प्रचलित नसणाऱ्या शब्दांचा वापर तंत्रात करणे. उदा. आधारस्यासिपाणिधारेष्वकुशलयोगता । या सूत्रात अकु म्हणजे वृक्ष व त्याचे शल असा अर्थ आहे. हे पद प्रसिद्ध नाहीत.

### २) दुःप्रणीतम् –

**दुःप्रणीतं नाम – सूत्रभाष्यप्रयोजनरहितम् ।**

असे तंत्र ज्यामध्ये सूत्र, भाष्य व प्रयोजन यांचे वर्णन नाही.

### ३) असङ्गतार्थ –

**असङ्गतार्थ नाम – यत्सूत्रेणासम्बध्दम् ।**

वर्णित विषयांचा शास्त्राशी संबंध नसणे. शास्त्रबाह्य विषयांचे वर्णन.



### ४) असुखारोहि पदम् –

**असुखारोहि पदं नाम – यत्पदसन्निवेशस्य विषमतया दुःखेनोच्चार्यते, चर्करीतादिप्रायम् । उदा. धातर्यरिप्रदम् ।**

उच्चारण्यास कठीण शब्दांचा वापर तंत्रात असणे.

### ५) विरूद्धम् –

**विरूद्धं – यद् दृष्टान्तसिद्धान्तसमयैः विरूद्धम् ।**

ज्यामध्ये दृष्टान्त, सिद्धान्त व समय यांची विरूद्धता असते.

I) दृष्टान्त विरूद्ध अ) पुरूष नित्य आहे घटाप्रमाणे ब) अग्नि उष्ण आहे जलवत् असे दृष्टान्त विरोधी विधान करणे.

II) सिद्धान्त विरूद्ध – मधुर, अम्ल, लवण हे रस कफाचे शमन करतात, कटु, तिक्त, कषाय रस वातशमन करतात. सिद्धान्तांच्या विरोधी विधान करणे.

III) समय विरूद्ध – आचार्यांनी पूर्वी लिहून ठेवलेल्या तत्त्वाच्या विरूद्ध तत्त्व चिकित्सेचे भेषज नाही असे म्हणणे समय विरूद्ध होय.

### ६) अतिविस्तृतम् –

**अतिविस्तृतं नाम – यथा – मधुरादिस्कन्धं ब्रुवन् यावन्ति मधुराणि जगति सन्ति मधुरप्रायाणि मधुरप्रभवाणि तान्यशेषाणि यद्यभिदधाति, तदाऽतिविस्तृतत्वं स्यात् ।**

एखाद्या विषयाचे अतिविस्ताराने वर्णन करणे. उदा. मधुरादि स्कन्ध सांगताना सृष्टीतील सर्व मधुर द्रव्यांचे वर्णन करणे म्हणजे अतिविस्तृत तंत्रदोष होय.

### ७) अतिसंक्षिप्तम् –

**अतिसंक्षिप्तं नाम – यथा – योगशतकप्रायम् । यथा वा– हेतुलिङ्गौषधोद्देश एव क्रियते, न तु तदवबोधकवाक्यानामिति शेषः ।**

एखाद्या विषयाचे अतिसंक्षेपाने वर्णन करणे. उदा. त्रिसूत्र आयुर्वेद. (हेतु, लिंग औषध)

### ८) अप्रयोजनम् –

**अप्रयोजनं नाम – यथा – (अ.हृ.सू. २/४८) 'इत्याचारः समासेन' इत्येतावद्यदि वदेत्, न तु ब्रूयात् 'यं प्राप्नोपि समाचरन् । आयुरारोग्यमैश्वर्यम् इत्यादि, तदा न कश्चिदनुतिष्ठेदिति ।'**

विषयाचे वर्णन करणे पण त्याचे प्रयोजन न सांगणे. उदा. सदाचाराचे वर्णन करणे परंतु त्याच्या दीर्घायु, आरोग्य, ऐश्वर्य, यश, मोक्षप्राप्ति या प्रयोजनांचे वर्णन न करणे.

### ९) भिन्नक्रमम् –

**भिन्नक्रमं नाम – पूर्वं येनानुक्रमेणोक्तं न तेनैव निर्दिश्यते प्रयोजनान्तरासम्भवेऽपि ।**

यामध्ये विषयसूचीमध्ये विषयक्रम एक आणि ग्रन्थामध्ये क्रम भिन्न असणे.

### १०) संदिग्धम् –

**संदिग्धं नाम – यथा – 'किमकालमृत्युरस्ति उत नास्ति?' इत्युभयत्र हेत्वाभासपरिग्रहात् संशयः ।**

एखाद्या विषयाचे वर्णन संदिग्ध / संशयपूर्ण असणे. उदा. अकालमृत्यु आहे की नाही.

### ११) पुनरूक्तम् –

**पुनरूक्तं नाम – योऽर्थ उक्तोऽपि पुनरूच्यते ।**

एखादा विषय पुनः पुनः सांगणे.

### १२) निःप्रमाणम् –

**निःप्रमाणं नाम – यथा (हृ.चि.अ. १/४६) 'पाक्यं शीतकषायं वा मुस्तापर्पटकम्' इति ।**

अशा विषयाचे वर्णन ज्याला प्रमाण नाही.



### १३) असमाप्तार्थम् –

**असमाप्तार्थ नाम – अत्र तावदुच्यते । परतोऽपि चेदित्येतत्ततः समाप्तार्थत्वान्न ज्ञायते किमनेन कार्यमिति ।**

एखाद्या विषयाचे पूर्ण रूपाने वर्णन न करता मध्येच समाप्त करणे.

### १४) अनर्थकम् –

**अनर्थकं नाम – यदन्यार्थेनापि पदेनापगताभिधेयम् ।**

ज्या शब्दांचा काही अर्थ नाही अशा शब्दांचा प्रयोग करणे.

### १५) व्याहतम् –

**व्याहतं नाम – यथा – पूर्वया वाक्ययुक्त्याऽपरा व्याहन्यते, अपरया पूर्वा वा । 'अनास्थाप्या मेहिनः' (हृ.सू.अ. १९/४)**

एखाद्या सिद्धान्ताचे पूर्वी वर्णन करून त्यानंतर त्या सिद्धान्ताविरूद्ध वर्णन करणे. उदा. अनास्थाप्या मेहिनः म्हणजे प्रमेह व्याधीमध्ये आस्थापन बस्ति निषिद्ध सांगून नंतर प्रमेहात आस्थापन बस्तिचा निर्देश करणे.

# ताच्छील्य

तच्छील शब्द तत् + शील यांच्या संयोगाने तयार झाला आहे.

ज्याच्याप्रमाणे शील किंवा स्वभाव असणारा भाववाचक संज्ञेच्या रूपाने हाच तच्छील शब्द बदलून ताच्छील्य शब्द तयार होतो.

सदृश्यभावयुक्त विषयाचे किंवा वस्तूचे ज्यांनीं ज्ञान होते त्याला ताच्छील्य म्हणतात.

## संख्या – १७

| क्र. | ताच्छील्यादि प्रकार | क्र. | ताच्छील्यादि प्रकार |
|---|---|---|---|
| १ | ताच्छील्य | १० | स्थान |
| २ | अवयव | ११ | तादर्थ्य |
| ३ | विकार | १२ | साहचर्य |
| ४ | सामीप्य | १३ | कर्म |
| ५ | भूयस्त्व | १४ | गुणनिमित्त |
| ६ | प्रकार | १५ | चेष्टानिमित्त |
| ७ | गुणिगुणविभव | १६ | मूलसंज्ञा |
| ८ | संसक्तता | १७ | तात्स्थ्य |
| ९ | तद्धर्मता | | |

## १) ताच्छील्य –

**यत्केनचिदेव धर्मसादृश्येन युक्तो भावस्ताच्छील्यमुच्यते ।**

गुणधर्म, स्वभाव किंवा प्रकृति यांच्या समानतेला ताच्छील्य म्हणतात. यामध्ये कुठल्याही दोन वस्तूंमधील एक किंवा अधिक गुणांमध्ये समानता असते. ज्याप्रमाणे सुप्त किंवा झोपलेल्या व्यक्तिचे स्पर्श ज्ञान नष्ट होते त्याप्रकारे जेव्हा वातप्रकोपामुळे स्वाप हे लक्षण दिसते, तेव्हा एखाद्या अवयवाचे स्पर्शज्ञान नष्ट होते. येथील सुप्ति किंवा स्वाप सादृश्य म्हणजे ताच्छील्य.



## २) अवयव –

**यत्रैकदेशोदाहरणे क्रियमाणेऽनुक्तोऽन्योऽपि तज्जातीयकोऽर्थो लभ्यते ।**

एकदेश किंवा विषयाच्या एका अंशाचे वर्णन केल्याने अनुक्त अशा दुसऱ्या अंशाचे, अन्य अर्थाचे ज्ञान होते. त्याला अवयव म्हणतात.

उदा. लंघनाद्वारे दोषशमन, लाघव, स्वास्थ आदि लक्षणे निर्माण होतात. असे एकदेशाचे वर्णन केल्यानंतर लंघन न झाल्यास गौरव, अस्वास्थादि लक्षणे उत्पन्न होतात या दुसऱ्या अर्थाचे ज्ञान होते. (अ.हृ.चि. १/३)

## ३) विकार –

**विपरीतक्रिया । यथा – विकारसंज्ञया प्रकृतिरपि लभ्यते । प्रकृतिसंज्ञया च विकारः । तत्र विकारसंज्ञया च प्रकृतिर्यथा ।**

विकार म्हणजे विपरित क्रिया, विकार संज्ञेने (कार्यवाचक पदाने) प्रकृतिचा म्हणजे कारणाचा बोध होतो. प्रकृति संज्ञेने (कारणवाचक पदाने) विकाराचा म्हणजे कार्याचा बोध होतो. उदा. शाक म्हणजे भाजी, या भाजीची निर्मिती वनस्पतींवर अग्नि आदिंची प्रक्रिया झाल्यानंतर अवस्थांतराने होते. एखादी भाजी गुरू आहे असे म्हटल्यावर ती भाजी ज्या पत्र, पुष्प, कंद आदि कारणांनी बनते त्यांचे ज्ञान होते. एखादे पत्र, पुष्प, कंद गुरू आहे या प्रकृतिदर्शक संज्ञेने त्या पत्रपुष्पकन्दादिंच्या विकाराचा बोध होतो. (अ.हृ.सू. ६/११४)

## ४) सामीप्य –

याचे विवेचन ग्रंथात नाही. ज्यांच्या गुणधर्मात समानता आढळते त्या द्रव्यांमध्ये सामीप्य आहे असे म्हणतात. उदा. घृत व तैल.

## ५) भूयस्त्वम् –

**यदेकस्मिन् वर्तमानमाधिक्येन क्वचिल्लभ्यते ।**

भूयस्त्व म्हणजे अधिकता हे भूयस्त्व एखाद्या द्रव्याच्या गुण–कर्माला वाढवण्यास प्रयुक्त करते.

उदा. अम्ल रस भोजनाची रूचि वाढवतो. व वर्णनात अम्ल रसात रूचिजनकत्व आधिक्याने आहे एवढेच सांगायचे असते. मधुररस रोचक नाही असा अर्थ त्यात अभिप्रेत नसतो. (च.सू. २६/४२)

## ६) प्रकार –

**यो यस्य समानधर्मा स तस्य प्रकारः ।**

जो ज्याच्या समानधर्मी समान गुणाचा आहे तो त्याचा प्रकार होय. जे ज्या गुणाचे असते त्या गुणाने युक्त दुसरे तत्समानधर्मी द्रव्य म्हणजे त्या द्रव्याचा प्रकार होय.

उदा. कण्ठाला एरण्डनालेने स्पर्श केल्याने वमन होते असे म्हणताना एरण्डनाला सारख्या इतर मृदुनालांचाही वमनासाठी वापर करण्यास हरकत नाही हे लक्षात घ्यावे.

## ७) गुणिगुणविभव –

**क्वचित् गुणीनि गुणशब्देनोक्तानि ।**

काहीवेळा गुणांचे गुण असे वर्णन केले जाते. उदा. पार्थिवाः पार्थवानेव । पार्थिवादि गुण असलेल्या आहाराचे पचन करतात व शरीरातील पार्थिवादि गुणांचे पोषण करतात. वरील सूत्रात पार्थिव गुण हा शब्द पार्थिवादि द्रव्य या अर्थी घेणे संयुक्तिक आहे कारण पार्थिवनामक निराळे गुण नाहीत. (अ.हृ.शा. ३/६०)

## ८) संसक्तता –

**यदेकस्य बहुभिः सम्बधः । यथा – विद्यमानेष्वषि तत्रान्येषु सम्बन्धेषु तस्यैव व्यपदेशः क्रियते ।**

एका द्रव्याचा अनेकांशी संबंध असतो. उदा. मधुरस्कंधामध्ये मध या कषाय रसात्मक द्रव्याचा अन्तर्भाव होतो कारण मध मधुरप्राय आहे.



## ९) तद्धर्मता –

**येन तथाभूतं सत्तद्धर्मतामासाद्य दर्शनात्तामेवाख्यां लभते ।**

या सारखाच/तत्समान धर्म असलेल्या पदार्थाला तीच संज्ञा आहे. उदा. चिकित्साशास्त्राचे सत्य ज्ञान नसणाऱ्या वैद्याचे पाश हे यमाच्या पाशाप्रमाणे असतात असे शास्त्रकार वर्णन करतात. यमाच्या पाशाप्रमाणे मारण्याचा धर्म असणारे पाश असे तद्धर्मतेचे वर्णन आहे. (अ.हृ.उ. ४०/७६)

## १०) स्थान –

**यत्र स्थानिना स्थानं स्थानेन वा स्थानी व्यपदिश्यते ।**

स्थानीने स्थानाचे किंवा स्थानाने स्थानीचे वर्णन करणे. उदा. कर्णरोगात कर्णनाद या व्याधीचे वर्णन आले आहे. येथे श्रोत्रेंद्रियाचा व्याधी असे म्हटले नाही. श्रोत्रेन्द्रियाचे श्रोत्र हे अधिष्ठान आहे. येथे स्थानी म्हणजे श्रोत्रेन्द्रिय व स्थान म्हणजे कर्ण किंवा श्रोत्र श्रोत्रेंद्रिय ज्या स्थानी आहे त्या स्थानाचा रोग असा श्रोत्ररोगाचा अर्थ आहे.

स्थानाने स्थानीचे वर्णन करणे याचे उदा. जिव्हा रसं गृह्णाति । जिभेने रसाचे ज्ञान होते. परंतु वास्तविकरीत्या जिभ हे अधिष्ठान व रसनेंद्रिये हे स्थानी आहे. रसाचे ज्ञान रसनेंद्रियाने होते जिभेने नाही. परंतु म्हणतांना जिभेने रसज्ञान होते. असे म्हटले जाते.

## ११) तादर्थ्य –

**यत्प्रयोजनार्थं प्रवर्तते यो भावस्तेनैव व्यपदिश्यते ।**

जे भाव द्रव्य प्रयोजनार्थ उपयोगास आणतात त्या प्रयोजनाचेच नाव त्या भावास देणे म्हणजे तादर्थ्य. उदा. छर्दन म्हणजे वमन हे कर्म वमनास उपयोगी पडणाऱ्या मदन मधुक लम्बा... । या छर्दनीय गणाद्वारे केले जाते. (अ.हृ.सू. १५/१)

## १२) साहचर्य –

**यो येन नित्यं सम्बन्ध उपलभ्यते, स तस्मात् सम्बन्धात्तमेव सम्बन्धिशब्दं लभते।**

ज्या द्रव्यांमध्ये निश्चितरूपाने नित्य संबंध असतो त्याला साहचर्य म्हणतात.

उदा. धूम व अग्नि यांच्यातील साहचर्य काष्ठादिंचे मन्थन करताना धूर येतो असे पाहून अग्नि उत्पन्न झाला असे म्हणणे.

## १३) कर्म –

**यत्र कर्मकर्मेति चोपचर्यते ।**

एखाद्या कर्माचा उपचारतः कर्ता म्हणून वापर करणे. उदा. मुनयः प्रशमं जग्मुः । च.शा. ५/२४ वरील उदाहरणात जग्मु म्हणजे गेले. प्रशम म्हणजे इन्द्रिये विषयापासून निवृत्त होणे. अशा तऱ्हेने वरील वाक्याचा अर्थ होतो. इंद्रियसंयम करून मुनींना मनःशांती मिळाली. गम् या गत्यर्थक धातुचा गमन हा अर्थ नसून लक्षणेने क्रिया निवृत्ती असा अर्थ होतो.

## १४) गुणनिमित्त –

**यत्कस्य विभूतिः प्रशंसादिका ख्याप्यते ।**

गुणनिमित्त एखाद्या विषयाची प्रशंसात्मक विभूती वर्णन करणे. उदा. ब्रह्मचर्याची विभूती वर्णन करताना ब्रह्मचर्य हे धर्म, यश देणारे, आयुष्यकर आहे असे म्हटले आहे. 'धर्म्यं यशस्यमायुष्यं लोकद्वयपरायणम् । अनुमोदामहे ब्रह्मचर्यमेकान्तनिर्मलम्' ॥ (अ.हृ.उ. ४०/४)

## १५) चेष्टानिमित्त –

**यस्मिन्नाममात्रं कस्यचित् क्रियया भवति भावस्य । नात्र प्रस्पन्दक्रियेष्टा ।**

एखाद्या विषयाचे नाममात्र क्रियेने वर्णन करणे. उदा. दिव्याप्रमाणे ज्ञान प्रज्वलित होते हे वर्णन ज्ञानाची प्रकाशक्रिया लक्षात घेऊन प्रशंसा करण्यासाठी आलेले आहे. येथे ज्ञान हे दिव्याच्या ज्वालेप्रमाणे उर्ध्वगामी आहे किंवा जवळ असणाऱ्या वस्तूंचे ज्वलन करते हे सांगण्याचा उद्देश नाही.



## १६) मूलसंज्ञा –

**या लोकेऽन्यस्मिन्नर्थे प्रसिद्धा तन्त्रे चान्यस्मिन् (अर्थे) निवेशिता ।**

व्यवहारात एका अर्थी प्रचलित असलेली संज्ञा स्वशास्त्रात त्यापेक्षा वेगळ्या अर्थाने योजणे.

उदा. निदान पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा / सम्प्राप्तिशच. इति । यापैकी रूप याचा आयुर्वेदातील अर्थ लक्षण असा आहे परंतु व्यवहारात हाच रूप शब्द नील, पीत, लोहितादि रूप या अर्थाने प्रसिद्ध आहे. (अ.हृ.नि. १/२)

## १७) तात्स्थ्य –

**यदन्यस्यैवार्थस्य तत्स्थत्वादन्यस्यैव कल्प्यते ।**

ज्या ठिकाणी राहणे असा किंवा वस्तुतः त्याचे नसलेले लक्षण त्याचेच असल्याचे वर्णन हे तात्स्थ्यामुळे होते. उदा. बस्तिमेहनयोः शूलम् । बस्ति किंवा मेढ्र यांच्या ठिकाणी शूल असे वर्णन करताना शूल ही संवेदना सचेतन अशा पुरूषाची आहे. परंतु येथे ती बस्ति व मेढ्र या अचेतन अवयवांना दिली आहे. बस्त्यादिंचा शूल हे तात्स्थ्याने आलेले वर्णन आहे. (अ.हृ.नि. १०/२३)

# कल्पना

कल्पना शब्द कल्प् या धातुपासून तयार झाला आहे.

शास्त्रोक्त गूढ विषय स्पष्टरूपाने समजण्यासाठी कल्पना वर्णन केल्या आहेत. कल्पना म्हणजे सुखाने विषय समजण्याचा विधी.

'कल्पना' हे पद आयुर्वेदामध्ये विविध अर्थांनी वापरले जाते. उदा. भेषज्य कल्पना, कषाय कल्पना इ.इ. परंतु याठिकाणी कल्पना याचा अर्थ शब्दांची रचना, शैली, अर्थ वा विधानक्रम होय. ग्रंथरचना विधिवत् शैलीमध्ये करण्यासाठी, तंत्राचा अर्थ लावण्यासाठी सप्तविध कल्पना निर्माण केल्या गेल्या आहेत. या सप्तकल्पनांमुळे तंत्रातील गूढ शब्दांचे अर्थ प्रकट होतात. या कल्पनांचे वर्णन अष्टांगहृदयाचे टीकाकार अरूणदत्त यांनी विस्तृतपणे केले आहे, त्याचप्रमाणे शंकर शर्मा यांच्या तंत्रयुक्ती नामक ग्रंथातही ह्यांचे वर्णन आढळते.

कल्पनांची संख्या ७ सांगितली आहे.

| क्र. | अरूणदत्त नुसार कल्पना | शंकर शर्मा नुसार कल्पना |
|---|---|---|
| १ | प्रधानस्य कल्पना | प्रधान कल्पना |
| २ | प्रधानेन कल्पना | --- |
| ३ | गुण कल्पना | गुण कल्पना |
| ४ | लेश कल्पना | लेश कल्पना |
| ५ | विद्या कल्पना | --- |
| ६ | भक्ष्य कल्पना | --- |
| ७ | आज्ञा कल्पना | आज्ञा कल्पना |
| ८ | --- | इंगित कल्पना |
| ९ | --- | विभव कल्पना |
| १० | --- | भक्ति कल्पना |

ह्या सात कल्पनांचे वर्णन पुढीलप्रमाणे -



## १) प्रधानस्य कल्पना -

**प्रधान कल्पना द्विधा - प्रधानस्य कल्पना प्रधानेन वा कल्पना प्रधान कल्पना ।**

प्रधानाचे वर्णन करणे. समान गुणात्मक अनेकविध घटकांमध्ये/समान गुणधर्म असलेल्या अनेक द्रव्यांमध्ये जो प्रधान असतो त्याचे वर्णन करणे म्हणजे प्रधान कल्पना होय. एक समान लक्षणे, गुणधर्म असणाऱ्या घटकांमध्ये तुलनेने जो सर्वश्रेष्ठ असतो त्याचे प्राधान्याने वर्णन करणे.

उदा. - सर्व स्नेहन द्रव्यांमध्ये घृत हे श्रेष्ठ आहे. सर्व जीवनीय द्रव्यांमध्ये दुध हे श्रेष्ठ सर्व वामक द्रव्यांमध्ये मदनफळ श्रेष्ठ, सर्व वृष्य द्रव्यांमध्ये स्त्री श्रेष्ठ ! इ.इ.

## २) प्रधानेन कल्पना -

प्रधानाच्या सहाय्याने प्रधानाच्या आधारावर वर्णन करणे म्हणजे प्रधानेन कल्पना होय. प्रधान द्रव्याच्या अंतर्गत त्याच्याशी संबंधित इतर अप्रधान द्रव्यांचे वर्णन करणे म्हणजे प्रधानेन कल्पना होय.

उदा. क्षीरवर्गात सर्वश्रेष्ठ असलेल्या क्षीराबरोबर (दुधाबरोबर) त्याचेच विकार असलेले दधि, नवनीत, तक्र, मस्तु, घृत इ. चे वर्णन करणे.

प्रमुख घटकाच्या नावाच्या अंतर्गत त्याच्याशी संबंधीत अप्रधान घटकांचे वर्णन करणे.

## ३) गुण कल्पना -

**येन धर्मेणोपेतोऽर्थः प्रयुज्यमानः समर्थो भवति, तेन धर्मेण युक्तस्य तस्यासावगुणोऽपि गुर्वादिष्वपाठाद्गुण इति कल्प्यते ।**

गुणाच्या लक्षणांनी युक्त नसलेल्या घटकांना देखील प्रसंगी गुण म्हणून संबोधणे, म्हणजे गुणकल्पना होय. उदा. चिकित्सेच्या चतुष्पादांचे वर्णन करतांना त्या प्रत्येकाचे चारचार गुण सांगितले आहेत. उदा. दक्ष, दृष्टकर्मा, शुचि, संपन्न, योग्य, आढ्य, ज्ञापक, सत्ववान् इ. शास्त्रामध्ये वर्णित ४१ गुणांमध्ये यांचा समावेश होत नाही. परंतु तरीही त्यांना या ठिकाणी गुण असे संबोधले आहे, यास गुणकल्पना असे म्हटले आहे.

गुर्वादि गुणांना गुण म्हटले जाते. परंतु त्यांच्यात समावेश नसणाऱ्या अगुण धर्माला गुण म्हणुन संबोधणे.

## ४) लेश कल्पना :

**अनुपदिष्टस्य विधेः कण्ठपाठेन यत्किंश्चित्सूत्रावयवान्तरमाश्रित्यार्थः कल्प्यते ।**

शास्त्रात साक्षात् शब्दांनी वर्णन न केलेला विषय (गूढार्थ) हा सूत्राच्या अंतर्गत येणाऱ्या पदाच्या सहाय्याने वर्णन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे लेश कल्पना होय. जो अर्थ शास्त्रकारांनी स्पष्टपणे सांगितलेला नाही तो इतर संदर्भांच्या आधारे समजून घेणे म्हणजे लेश कल्पना. उदा. १) मृत्युचे दोन प्रकार आहे कालज व अकालज परंतु त्यांची स्पष्ट लक्षणे सांगितली नाहीत. अरिष्ट लक्षणे ही काल मृत्यु सूचक आहेत. अकाल मृत्युमध्ये अरिष्ट लक्षणे दिसत नाहीत, म्हणून पथ्य व औषध सेवनाने जो टाळता येतो तो अकाल मृत्यु. या विपरीत जो पथ्य व औषधाने टळत नाही तो काल मृत्यु असे मृत्युचे लक्षण वर्णन करणे म्हणजे लेश कल्पना होय.

२) रसांचा दोषांवरील परिणाम वर्णन करतांना 'तत्राद्या मारूतं घ्नन्ति' म्हणजे मधुर, अम्ल, लवण हे वात शमन करतात याचाच अर्थ उर्वरीत तिघे म्हणजे कटु, तिक्त, कषाय हे रस वात वर्धन करतात.

जो अर्थ शास्त्रकारांनी स्पष्टपणे सांगितलेला नाही तो इतर संदर्भाच्या आधारे समजून घेणे म्हणजे लेश कल्पना. उदा. कालमृत्यु व अकालमृत्यु यांची स्पष्ट लक्षणे आलेली नाहीत. अरिष्ट लक्षणे ही ग्रंथात कालमृत्युसूचक आहेत. अपथ्य सेवन केल्याने अकालमृत्यु होतो. म्हणून पथ्य व औषधांनी जो टाळता येतो तो अकालमृत्यु व त्यापासून भिन्न असा कालमृत्यु हे लेश कल्पनेद्वारे स्पष्ट केले आहे.

## ५) विद्या कल्पना –

**यथा सर्वविद्यानुगतार्थनिर्देशे शास्त्रकारस्य सर्वविद्यास्थानानुप्रवेश इह शास्त्रे हित इति वचनाद्विनाऽपीष्यते ।**

दुसऱ्या शास्त्रातील उपयोगी सिद्धातांचा आवश्यकतेनुसार स्वतःच्या शास्त्रात उल्लेख करण्याला विद्या कल्पना म्हणतात. उदा. योग या विषयाचे वर्णन आयुर्वेदात मोक्षमार्ग म्हणून केले आहे. यावरून शास्त्रकाराला अन्य किती विविध शास्त्राचे ज्ञान आहे हे समजून येते यालाच इंगित कल्पना असे ही म्हणतात.



## ६) भक्ष्य कल्पना –

प्रत्यक्ष भक्षण करण्याचा (खाण्याचा) विषय नसतांना सुद्धा ग्रहण करण्यायोग्य विषयाचे भक्ष्य म्हणून कल्पना करणे म्हणजे भक्ष्य कल्पना होय.
उदा. १) आयुर्वेद हे साक्षात् अमृत आहे. अमृत हे भक्षण करण्याचे द्रव्य आहे. याठिकाणी आयुर्वेदाची अमृताशी तुलना करून असे सूचवायचे आहे की ज्याप्रमाणे अमृत सेवनाने चिरायु आरोग्य प्राप्त होते त्याप्रमाणे आयुर्वेदाच्या पालनाने चिरायु व आरोग्य प्राप्त होते. 'एतत्तदमृतं साक्षात्' उदा. (अ.हृ.उ. ४०/७५).

## ७) आज्ञा कल्पना –

**यस्यानुष्ठाने हेतुः सम्यगवन्तुं न शक्यः, केवलमाप्तवचनं प्रमाणीकृत्यानुष्ठीयते ।**

जेव्हा शास्त्रामध्ये केलेल्या उपदेशाचा हेतु समजत नाही तेव्हा ती शास्त्रकारांची आज्ञा आहे अशी कल्पना करणे म्हणजे आज्ञा कल्पना होय.

ग्रंथात वर्णिलेल्या काही वाक्यांचे कारण समजणे अशक्य असते तेव्हा त्या वाक्यात आप्तांची आज्ञा आहे ही आज्ञा कल्पना होय. उदा. सद्वृत्तामध्ये गवत उपटू नये. जमिनीवर लिहू नये असे म्हटले आहे. परंतु हेतु सांगितला नाही ही आज्ञा कल्पना.

शंकर शर्मानुसार अन्य काही नेमक्या कल्पनांचे वर्णन पुढील प्रमाणे –

१) इंगित कल्पना – विद्या कल्पनेप्रमाणे – विद्या कल्पना म्हणजेच इंगित कल्पना होय.

२) विभव कल्पना – कुठलाही विषय प्रथम वर्णन केल्यानंतर पुढील एखाद्या प्रसंगी त्याचे वर्णन अध्यहृत धरणे म्हणजे विभव कल्पना होय. उदा. चरक सूत्रस्थान स्वेदाध्यायामध्ये कुटीस्वेदाचे वर्णन आले आहे. पुढे चरक चिकित्सा स्थान ज्वर चि. अध्यायात ज्वराच्या चिकित्सेत कुटीस्वेदाचा उल्लेख आल्यावर मागे वर्णन केलेल्या स्वेदाध्यायातील कुटीस्वेदाचे वर्णन अध्यहृत धरणे.

३) भक्ती कल्पना – भक्ति उपचार लक्षणा आहे अर्थात या पदाचे अन्य अर्थ सुद्धा निघतात तीच भक्ति कल्पना होय. उपचार युक्त कल्पना करणे म्हणजे भक्ती कल्पना. उदा. सर्व अमृतांमध्ये आयुर्वेद श्रेष्ठ आहे.

४) विभक्त कल्पना – एखाद्या पदाचे विस्तृत वर्णन नसतांना त्याची कल्पना करणे म्हणजे विभक्त कल्पना होय. उदा. त्रिसूत्र आयुर्वेद हे म्हटल्यावर हेतु, लिंग, चिकित्सा ह्या तीन घटकांचे लक्षण, भेद इ. नुसार विस्ताराने वर्णन समजून घेणे.

# अर्थाश्रय

अर्थाश्रयांचे वर्णन हे बृहत् त्रयींच्या मूळ संहिता सूत्रांमध्ये केलेले नाही.

अशा पद्धतीने ग्रंथाध्ययन व सूत्रांचा गर्भितार्थ ठरविण्याच्या पद्धतीचा संदर्भ हा फक्त अष्टांगहृदय ह्या ग्रंथाच्या अरूणदत्तांच्या 'सर्वांगसुंदरा' ह्या टीकेमध्ये आढळतो.

अरूणदत्तांनी तन्त्रयुक्ति, तन्त्रगुण, तन्त्रदोष, ताच्छील्य, कल्पना ह्यांच्या सोबत अर्थाश्रयांचे वर्णन केले आहे.

एकूण २० अर्थाश्रयांचे वर्णन केलेले आहे.

अर्थाश्रय हे पद दोन शब्दापासून तयार झाला आहे.

अर्थ + आश्रय

शास्त्रात दिलेल्या विषयांचा अर्थ सोप्या रीतिने समजण्यासाठी ज्या युक्तींचा आश्रय घेतला जातो त्या युक्तींना अर्थाश्रय म्हणतात.

अरूणदत्तानुसार संख्या - वीस

भट्टार हरिश्चंद्रानुसार संख्या - एकवीस

सप्तविध कल्पनांचे वीस आश्रय आहेत.

आश्रय शब्दाचा उपयोग स्वीकृती, संबंध किंवा संगती या अर्थाने केला आहे. शास्त्राचे अध्ययन सोप्या पद्धतीने व्हावे तसेच त्याचा अर्थ सहजतेने समजण्याच्या हेतुने शास्त्राची रचना करताना त्यामध्ये येणाऱ्या शब्द, वाक्य, अर्थ आणि भाव याची संगती बसणे आवश्यक असते, हा उद्देश लक्षात घेऊन या युक्तींना आश्रय संज्ञा दिली आहे.

## उपयोगिता -

- साहित्यिक अनुसंधानासाठी
- तन्त्रशैलीचा अभ्यासाने ग्रंथकर्त्याची लिखाणशैली व उद्देश समजतो.
- जे पद साक्षात वर्णित नाहीत त्यांच्या ज्ञानार्थ व गूढ अर्थाच्या व्यक्तीकरणासाठी ज्या पदांचे विविध अर्थ असतात. त्यांच्या त्याठिकाणी योग्य अर्थाची निश्चिती करण्यासाठी - प्राकृत ह्या अर्थाश्रयाची उपयोगिता
- समानतन्त्र प्रत्यय - सिद्धान्त स्पष्ट करण्यासाठी
- परतन्त्र प्रत्यय - हे एक साधन म्हणून एका विषयातील विविध सिद्धान्तांना



प्रकट करण्यासाठी उपयुक्त व ज्ञानाच्या निश्चयार्थ महत्त्वाचे हेतुहेतुकधर्म हा अर्थाश्रय नैदानिक पद्धतीसाठी उपयुक्त आहे.

- शब्दान्तर हे द्रव्यांच्या पर्यायानुसार त्याचे निश्चितीकरणासाठी उपयुक्त
- उर्वरीत सर्व अर्थाश्रय हे तद्तद् विषय संपूर्णशः समजण्यासाठी उपयुक्त आहेत. तसेच सिद्धान्तांचे निश्चितीकरण व सिद्धान्तांची चिकित्सकीय उपयोगिता ठरविण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

## आवश्यकता -

१) अर्थ स्पष्ट होण्यासाठी
२) सिद्धांतावर प्रकाश टाकण्यासाठी
३) सूत्रांचा व्यवहारात उपयोग करण्यासाठी
४) सध्या पूर्णतः उपलब्ध नसलेल्या काश्यपसंहितेसारख्या ग्रंथातील अनुपलब्ध सूत्रांची योजना करणे.
५) सिद्धान्त वा विषयांच्या उपयोगित्वासाठी
६) विविध अर्थाच्या पदांच्या निश्चितीकरणासाठी
७) गूढ पदांच्या अर्थ निश्चितीसाठी
८) शास्त्र समजण्याच्यासाठी उपयुक्त साधन स्वरूप

| क्र. | अर्थाश्रय | क्र. | अर्थाश्रय |
|---|---|---|---|
| १ | आदिलोप | १२ | परतन्त्रप्रत्यय |
| २ | मध्यलोप | १३ | हेतुहेतुकधर्म |
| ३ | अन्तलोप | १४ | कार्यकारणधर्म |
| ४ | उभयपदलोप | १५ | आद्यन्तविपर्यय |
| ५ | आदिमध्यान्तलोप | १६ | शब्दान्तर |
| ६ | वर्णोपजनन | १७ | प्रत्यय |
| ७ | ऋषिक्लिष्ट | १८ | उपनय |
| ८ | तन्त्रशील | १९ | संभव |
| ९ | तन्त्रसंज्ञा | २० | विभव |
| १० | प्राकृत | २१ | भट्टार हरिश्चंद्रानुसार - उपधालोप / उपाधिलोप |
| ११ | समानतन्त्रप्रत्यय | | |

## अर्थाश्रय –

### १) आदिलोप –

सूत्ररचना करताना एखाद्या शब्दसमूहामध्ये प्रथम पदाचा लोप केलेला असतो. त्याची उपस्थिती व अर्थग्रहण हे 'आदिलोप' ह्या अर्थाश्रयानुसार करावे लागते.

उदा. १) बृंहणः प्रीणनो वृष्यश्चक्षुष्यो वृषहा रसः । (अ.हृ.सू. ६/३२)

ह्या सूत्रात 'रस' पदाच्या आधी 'मांस' ह्या पदाचा लोप केलेला आहे. अर्थाश्रयानुसार मांस पद गृहीत धरून अर्थ लावल्यास हे सूत्र मांसरसाच्या गुणांच्या वर्णनाचे आहे, हे स्पष्ट होते.

२) धारणोदीरण... ।। (अ.हृ.नि. १/१४)

ह्या सूत्राच्या 'धारणोदीरण' ह्या पदामध्ये आधी 'वेग' ह्या पदाचा लोप केलेला आहे. 'वेग' हे पद गृहीत धरून अर्थ केल्यास सूत्राचा अर्थ स्पष्ट होतो.

### २) मध्यलोप –

सूत्रामध्ये एखाद्या पदसमूहातील मधल्या पदाचा लोप केलेला असतो. अशा ठिकाणी त्या मधल्या लोप केलेल्या पदाचे अस्तित्व गृहीत धरून अर्थनिश्चिती करावी लागते.

उदा. (अ.हृ.सू. ५)

द्रवद्रव्यविज्ञानीय या नावामध्ये द्रव्य व विज्ञानीय यांच्यामध्ये स्वरूप या शद्वाचा लोप झाला आहे. मध्यलोप काढून टाकल्यास 'द्रवद्रव्यस्वरूपविज्ञानीयम्' असे म्हटल्याने अर्थबोध नीट होतो. स्वरूप या मध्य शब्दाचा लोप आहे हे पुढील 'अन्नस्वरूपविज्ञानीय' या अध्यायाच्या नावावरून स्पष्ट होते.

### ३) अन्तलोप –

शेवटच्या शब्दाचा लोप म्हणजे अन्तलोप, उदा. (अ.हृ.शा. ३/३६-३७) गौरी सिरा कफाचे वहन करतात या वाक्यामध्ये कफ शब्दानंतरच्या अस्त्र शब्दाचा लोप आहे. कफानंतरचा अस्त्र शब्दाचा लोप काढल्यास गौरी सिरा कफास्त्रवहन करतात असा स्पष्ट अर्थबोध होतो. अन्ती असणाऱ्या अस्त्र शब्दाचा लोप आहे. हे आधीच्या सूत्रात वातास्त्रवहन करणाऱ्या सिरा असे म्हटल्याने समजते.



### ४) उभयपदलोप –

ह्यामध्ये आदि-अन्त, आदि-मध्य किंवा मध्य-अन्त अशा दोन पदांचा लोप केलेला असतो.

उदा. – (अ.हृ.शा. ३/५७)

षड्रसात्मक अन्न सेवन केल्यावर आधी ते मधुरीभूत (मधुर अवस्थापाक) होते त्यानंतर मध्ये ते अम्लीभूत (अम्ल अवस्थापाक) होते. या वर्णनात मध्ये हा शब्द लुप्त आहे. लोप काढल्यास अर्थ स्पष्ट होतो. तसेच शेवटी या अन्नाचा कटु अवस्थापाक होतो. या वर्णनात अंती शब्द लुप्त झाला आहे. वरील अन्नपचनासंबंधीच्या वर्णनात मध्ये व अंती या दोन पदांचा लोप झाला आहे. म्हणून उभयपदलोप असे म्हटले आहे.

याचे तीन प्रकार असतात.

१) आदि-मध्य लोप
२) आदि-अन्त लोप
३) मध्य-अन्त लोप

### ५) आदिमध्यान्तलोप –

सूत्ररचनेमध्ये एखाद्या पदसमूहातील आदि, मध्य व अन्त अशा तीनही पदांचा लोप केलेला असतो.

उदा. (अ.हृ.शा. ३/५५) 'अन्नं कालेऽभ्यवहृतं' आदौ, 'कोष्ठं प्राणानिलाहृतम् ।' मध्ये, अन्ते च 'द्रवैः इत्यादि ।'

या सूत्रात आदौ मध्ये व अन्त या तीन पदांचा लोप झाला आहे. हा लोप काढून टाकल्यास

आदौ कोष्ठं प्राणानिलाहृतं । मध्ये अन्तेच द्रवैः भिन्नसंघातम् । असे सूत्र होऊन अर्थ स्पष्ट होतो.

यालाच 'सर्वलोप' असे सुद्धा म्हणतात.

### ६) वर्णोपजनन –

**यत्रानुक्तो ग्रन्थे वर्ण आचार्येण पश्चाद् व्याख्याकाल उपजन्यार्थोऽभिधीयते ।**

ग्रंथामध्ये आचार्यांद्वारे व्याख्या वर्णन करताना काही वर्ण अनुक्त राहिले आहेत ते वर्ण घालून वाक्यार्थ पूर्ण करणे म्हणजे वर्णोपजनन. वाक्यशेष ही तंत्रयुक्ति

वर्णोपजननाप्रमाणे असते.

उदा. 'तत्र खात्खानि देहेऽस्मिन् श्रोत्रं शब्दो विविक्तता'

तथा – वातात्स्पर्शत्वगुच्छ्वासा वह्नेर्दृग्रूपपक्तयः ।।'

या सूत्रात भवन्ति हा अनुक्त वर्ण घातल्यास अर्थ स्पष्ट होतो. (अ.हृ.शा. ३/३)

## ७) ऋषिक्लिष्ट –

**ऋषि ऋषिपुत्रो वाऽसमाहितचित्ततयाऽशक्त्या वा किञ्चित्पदजातम (जातं) भ्रष्ट मुच्चारितवान् तथैव तल्लोके प्रयुज्यते ।**

यथा 'रोम लोम' इत्यादि ।

ग्रंथातील काही पदांचा ऋषींद्वारे क्लिष्ट उच्चार झाल्याने सामान्य लोकांमध्येही तोच उच्चार केला जातो. उदा. रोम या शब्दाचा लोम असा उच्चार.

## ८) तन्त्रशील –

**या तन्त्रकाराणां प्रकृतिः स्वभाव इत्यर्थः ।**

**यथा – किञ्चिच्छिष्यानुग्रहार्थ विस्तीर्ण सङ्क्षिपन्ति,**

हे ग्रंथकर्त्याच्या रचनाशैलीवर अवलंबून आहे. तो एखादा विषय संक्षेपाने तर एखादा विषय विस्ताराने वर्णन करतो. त्याची ही वैशिष्ट्यपूर्ण शैली असते.

तंत्रकर्ता काही मोठे विषय शिष्याला समजण्यासाठी संक्षेपाने सांगतो. उदा. अस्थि ३६० आहेत हे संक्षेपाने सांगणे. तसेच काही विषय विस्ताराने सांगतो. उदा. अंगविभागात सिरांचे विस्ताराने वर्णन केलेले आहे. संक्षेपाचा विस्तार व विस्तृताचा संक्षेप करणे म्हणजे तंत्रशील. (अ.हृ.शा. ३/१६)

## ९) तन्त्रसंज्ञा –

**यत्कस्मिंश्चिदर्थे मध्ये व्याख्यायमाने स्वतन्त्रसिद्धोदाहरणं तत्प्रमाणार्थमुच्यते ।**

**यथा–नवज्वरे कषाया अपक्वेषु दोषेषु वर्जनीया उक्ताः ।**

तंत्रकर्ता काही संज्ञा त्या त्या ठिकाणी विशेष अर्थी स्वतंत्र सिद्ध वापरतो. त्यास तंत्रसंज्ञा म्हणतात. उदा. नवज्वरात कषाय निषेध सांगितला आहे, येथे कषाय याचा अर्थ कषाय रस निषिद्ध असा आहे. पंचविध कषायातील क्वाथ हा अर्थ अपेक्षित नाही. (अ.हृ.चि. १/३९).



## १०) प्राकृत –

सूत्राचा संदर्भ कुठे आहे? अधिकरण कोणते आहे? याचा विचार करून पदांच्या तसंबंधीत अर्थाचे ग्रहण करणे.

उदा. ऊषकस्तुत्थकं हिङ्गु कासीसद्वयसैन्धवम् । (अ.हृ.सू. १५/२३) इत्यौषधाधिकारात् सैन्धवंलवणम्, न त्वश्वादिकम् । प्रसंगानुसार पदाचा अर्थ ग्रहण करणे म्हणजे प्राकृत, उदा. ऊषकादिगणात सैंधव या पदाचा अर्थ शेंदेलोण हा आहे. युद्धशास्त्रामध्ये सैंधव या पदाचा अर्थ घोडा असा होतो.

## ११) समानतंत्रप्रत्यय –

**यत्साध्यस्य कस्यचिदर्थस्य साधनायानुपलभ्यमाने स्वतन्त्रात् प्रत्यये समानेभ्यस्तन्त्रेभ्यः प्रत्यय इति ।**

समानतन्त्र याचा अर्थ एकाच शास्त्रातील दुसऱ्या ग्रंथातून संदर्भ घेणे. उदाहरणार्थ अष्टांगहृदयातील विषयाच्या संदर्भात आयुर्वेद शास्त्रातीलच चरक संहितेतील संदर्भ घेणे.

एखाद्या ग्रंथातील प्रकरणाचे समर्थन करण्यासाठी किंवा अर्थ स्पष्ट करण्यासाठी तत्समान दुसऱ्या ग्रंथाचा आधार घेऊन अर्थ स्पष्ट करणे. उदा. (अ.हृ.सू. २/३१) (च.सू. ८/१८) आचार्य वाग्भट म्हणतात, नखे, श्मश्रु यांचे कर्तन करावे. पण किती दिवसांनी करावे याचा उल्लेख चरकसंहितेत आला आहे १५ दिवसातून ३ वेळा नख व केस कापावेत.

## १२) परतंत्र प्रत्यय –

**यस्यार्थस्य प्रसिद्धितो न स्वकीयमुदाहरणं शक्यमभिधातुं नाप्यन्येभ्यो भिषक्तन्त्रेभ्यः ! ततस्तस्मिन् द्रये परतन्त्रादुदाहरणं कल्प्यते ।**

इतर शास्त्रांतील सूत्रविषयांचा आधार घेऊन स्वशास्त्रातील विषयांचा अर्थ स्पष्ट करणे.

जेव्हा स्वतःच्या किंवा तत्समान तंत्रातून अर्थ स्पष्ट होत नाही तेव्हा परतंत्राचा इतर शास्त्रांचा आधार घेऊन अर्थ स्पष्ट करणे. उदा. 'कालार्थकर्मणां योगो हीनमिथ्यातिमात्रकः । **सम्यग्योगश्च विज्ञेयो रोगारोग्यैककारणम्** ।।' (अ.हृ.सू. १/१९) वरील श्लोकात योगलक्षण स्वतःच्या किंवा तत्समान तंत्रात मिळत नाही तेव्हा

'स्वहेतुभ्यः शीतोष्णादिलक्षणेन कालस्योत्पत्तिरेव योग ।' या बौद्ध तंत्रातील सूत्राचा आधार घेऊन योग शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

## १३) हेतुहेतुकधर्म –

**यो हेतुहेतुकेन धर्मो ज्ञायते । यथा – पित्तातिसारिणः पित्तलातिसेवनात् पित्तमुद्रिक्तं रक्तातिसाराय न चिरादस्य भविष्यतीत्यनुमीयते, समर्थस्य हेतोः स्वकार्यस्याव्यभिचारात् ।**

पित्त प्रकोपक आहार विहाराने पित्तातिसार होतो, व पित्तातिसार झाल्यावर सुद्धा पित्तप्रकोपक हेतुंचे सेवन सुरूच राहिले, तर रक्तातिसार होतो.

म्हणजे हेतूच्या हेतूचे स्वरूप समजले हा 'हेतुहेतुकधर्म' अर्थाश्रय आहे.

स्वतःच्या हेतुचा हेतु हा धर्म कळणे म्हणजे हेतुहेतुक धर्म.

## १४) कार्यकारण धर्म –

**यत्र कार्यसंज्ञया कारणं निर्दिश्यते कारणसंज्ञया वा कार्यं, तत्र कार्यसंज्ञया तावत्कारणं निर्दिश्यते ।**

कार्य संज्ञेने कारणाचा व कारण संज्ञेने कार्याचा निर्देश करणे म्हणजे कार्यकारण धर्म, उदा. रोग संज्ञेने दोषवैषम्याचा निर्देश किंवा दोषवैषम्य संज्ञेने रोगाचा निर्देश करणे. दोष हा देखिल रोगाचा पर्याय आहे. येथे कारणस्वरूपी दोष शब्द कार्यरूप रोगासाठी योजला आहे.

## १५) आद्यन्तविपर्यय –

**यथा – अन्नस्वरूपविज्ञानं प्राप्तमुज्झित्वा पानमेव प्रथममुक्तं द्रवद्रव्यविज्ञानं कुर्वता, तोयादीनां पञ्चानां वर्गाणामल्पवक्तव्यत्वात् । समुद्रोपमतया शास्त्रस्यानुपूर्वसुखावगाहनार्थम्, पूर्वं ह्यल्पं सुखेनावगाह्यते पश्चात्प्रभूतमिति न्यायात् ।**

उद्देशाच्या क्रमामध्ये परिवर्तन करून निर्देशाने वर्णन करणे.

**उदा. ज्या विषयाचे आधी वर्णन यायला हवे त्याचे वर्णन नंतर करणे. जसे, –** द्रवद्रव्यविज्ञानीय ह्या अंतर्गत ५ वर्गाचे वर्णन आहे व अन्नस्वरूपामध्ये १२ वर्गाचे वर्णन आहे. अन्न स्वरूप विज्ञानीय व द्रवद्रव्य विज्ञानीय अध्यायाचे वर्णन अन्नस्वरूपानंतर यायला हवे होते. परंतु द्रवद्रव्य अध्याय छोटा असल्याने आधी वर्णन केला आहे. म्हणून द्रवद्रव्यविज्ञानीयाचे वर्णन आधी केलेले आहे.

आदि व अन्त या क्रमामध्ये विपर्यय करणे म्हणजेच आधी ज्याचे वर्णन यायला हवे त्याचे नंतर वर्णन करणे.



## १६) शब्दान्यत्व –

**यदर्थं पर्यायशब्दं वर्णयन्ति शास्त्रकृतः ।**

शास्त्रात एकाच अर्थाचे अनेक पर्याय सांगणे. उदा. व्याधी या शब्दाचे रोग, पाप्मा, ज्वर, आतंक, विकार, दुःख, आमय, यक्ष्मा आदि पर्यायी शब्द सांगितले आहेत. (अ.हृ.नि. १/१)

## १७) प्रत्ययधर्म –

**यो न च हेतुर्हेतुधर्मोपपत्तिमात्रेण च केनचिद्धेतुत्वेन व्यपदिश्यते ।**

यालाच प्रत्ययारूपधर्म असे सुद्धा म्हणतात. याचा अर्थ जो साक्षात हेतु नसून सुद्धा हेतु म्हणून त्याचे वर्णन केले जाते. त्याची कारणमीमांसा लावून बघितल्यास कुठेही हेतुधर्म दिसून येत नाही.

जो हेतु नाही त्याला हेतु म्हणून वर्णन करण्याचा धर्म. उदा. भूतोन्मादाचे देव, यक्ष, पिशाच हे हेतु सांगितले आहेत. वस्तुतः उन्मादाचे कारण प्रज्ञापराध हे आहे. (अ.हृ.उ. ४/१३)

## १८) उपनय –

**सूत्रहेतुप्रस्तावेन यत्रान्यत्प्रकरणमुपनीयते ।**

सूत्रातील विषयाशी हेतुभूत विषयाचे विवेचन करताना अन्य प्रकरणातील विषयांचे निरूपण करणे. उदा. मात्राशितीय अध्यायात आहार मात्रेचे विवेचन करताना अतिमात्रेमुळे होणाऱ्या विसूचिका व्याधीची चिकित्सा सांगणे.

## १९) सम्भव –

**यत्सूत्रं प्रकरणं वा विधीयमानमर्थस्य व्यापकत्वात् सकलेन शास्त्रेण व्याख्यायते ।**

जे सूत्र किंवा प्रकरण वर्णन करताना विषय व्यापक असल्याने शास्त्राची साकल्याने व्याख्या सांगणे म्हणजे संभव. उदा. कायबालग्रहोर्ध्वांगादि आठ अंगांची चिकित्सा या शास्त्रात सांगितली आहे या सूत्राद्वारे शास्त्राची सकल व्याख्या सांगितली आहे. (अ.हृ.सू. १/५)

## २०) विभव –

**विभवकल्पनायाश्चास्यायं विशेषः । अयं व्याख्याया विभवो भवति । स तु विनैव व्याख्यायाः पठयमान एवेति । सर्वत्र व्याप्त विशेषस्य विषय : विभव इति ।**

एखादा विषय हा संपूर्ण शास्त्रामध्ये वर्णित असतो. संपूर्ण ग्रंथामध्ये त्याच्याविषयी वर्णन असते. उदा. आयुर्वेद शास्त्रामध्ये त्रिदोष अष्टांग, पंचमहाभूत, सप्तधातु, सम्प्राप्ति इ. विशेष विषय हे विभव होय.

हा विभव अर्थाश्रय आहे. जो सूत्र किंवा विषय व्यापक असल्याने संपूर्ण शास्त्रांच्याद्वारे व्याख्यायित होतो.

<u>भट्टारक हरिश्चंद्रोक्त अर्थाश्रय</u>

## २१) उपधालोप / उपाधिलोप –

शेवटच्या पदाच्या पूर्वीच्या पदाला उपधा म्हणतात. त्याचा लोप म्हणजे उपधालोप.



# अष्टप्रकृति

**अष्टरूपम् – अष्टो रूपाणि यस्य तत्तथोक्तम् ।।**

महान, अहंकार व पंचतन्मात्राणि असे हे प्रकृतीचे सात रूप आहेत. हे सात रूप आणि स्वयं प्रकृति मिळून अष्टरूप निर्माण होते. याचे कारण असे की सांख्यशास्त्रकार शिलापुत्रकन्यायाने अव्यक्त करिता रूपित्व आणि रूपत्व हे दोन्ही मानतात. परंतु सांख्यशास्त्रामध्ये अष्टविध प्रकृतिचे मूलप्रकृति आणि प्रकृतिविकृति असे दोन प्रकार मानतात.

**मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्तः । षोडशकस्तु विकारो न प्रकृतिर्न विकृतिपुरूषः' ।। (सांख्यकारिका–३)**

| स्वरूप | संख्या | नाम |
|---|---|---|
| प्रकृति | १ | प्रधान, अव्यक्त, प्रकृति |
| विकृति | १६ | पंचज्ञानेंद्रिय, पंचकर्मेन्द्रिय, मन आणि पंचमहाभूत |
| प्रकृति विकृति | ७ | महत्, अहंकार, पंचतन्मात्रा |
| न प्रकृति न विकृति | १ | पुरूष |

वेदान्ता मध्ये सुद्धा प्रकृतिचे हेच अष्टविध रूप मानले जाते. परंतु त्यामध्ये प्रकृति परब्रह्म पासून उत्पन्न होण्याचे कारण रूपत्व व रूपित्व मानले जात नाही.

१) प्रकृति – हे असे तत्व आहे जे सर्वांचे 'कारण' आहे. परंतु कार्य कुणाचेच नाही. म्हणजेच प्रकृति ही सर्वांना उत्पन्न करते परंतु स्वतः कशापासून उत्पन्न होत नाही. ही संख्येमध्ये एक असते. प्रकृतीला प्रधान किंवा अव्यक्त सुद्धा म्हणतात.

संख्या – १

२) विकृति – हे असे तत्व आहे की जे कार्य असून कारण नाही. अर्थात स्वयं दुसऱ्यापासुन उत्पन्न होते पण अन्य कुणास उत्पन्न करीत नाही. म्हणून त्यास विकृति म्हणतात.

संख्या – १६ (पंच ज्ञानेंद्रिय + पंच कर्मेंद्रिय + मन + पंचमहाभूत)

३) प्रकृति विकृति – असे तत्व जे कार्य आणि कारण दोन्ही असते. अर्थात स्वयं कशापासून उत्पन्न होते आणि स्वतःपासून दुसऱ्यांची उत्पत्ती पण करतात. म्हणून त्यास प्रकृति विकृति म्हणतात.

संख्या – ७ (महत् + अहंकार + पंचतन्मात्रा)

४) न प्रकृति न विकृति – असे तत्व जे कशाचे कार्य किंवा कारण दोन्ही नसतात. म्हणून त्यास 'न विकृति न प्रकृति' म्हणतात. अर्थात हे तत्त्व कशापासून उत्पन्न होत नाही. स्वतःपासून कशाची उत्पत्ति करीत नाही अशा तत्वास 'पुरूष' असे म्हणतात.

संख्या – १

चरकांनी अव्यक्त यास पुरूष समन्वित प्रकृति मानले आहे या करिता त्यांनी चोवीस तत्वाचा उल्लेख केला आहे.

योगदर्शन सव्वीस तत्व मानतात; – चोवीस तत्वात्मक प्रकृति + पुरूष + ईश्वर असे सव्वीस तत्व होतात.

## प्रकृति पुरूष साधर्म्य –

| क्र. | प्रकृति | पुरूष |
|---|---|---|
| १ | अनादि | अनादि |
| २ | अनन्त | अनन्त |
| ३ | अलिङ्ग (निराकार) | अलिङ्ग (निराकार) |
| ४ | नित्य (लयरहित) | नित्य (लयरहित) |
| ५ | अपर (सर्वश्रेष्ठ) | अपर (सर्वश्रेष्ठ) |
| ६ | सर्वगत (सर्वव्यापक) | सर्वगत (सर्वव्यापक) |

## प्रकृति पुरूष वैधर्म्य –

| क्र. | प्रकृति | पुरूष |
|---|---|---|
| १ | एक | अनेक |
| २ | अचेतन | सचेतन |
| ३ | त्रिगुण | अगुण |
| ४ | बीजधर्मिणी | अबीजधर्मी |
| ५ | प्रसवधर्मिणी | अप्रसवधर्मी |
| ६ | अमध्यस्थ धर्मिणी | मध्यस्थ धर्मी |



## पुरूष गुण –

| क्र. | पुरूष गुण | क्र. | पुरूष गुण |
|---|---|---|---|
| १ | सुख | ९ | निमेष |
| २ | दुःख | १० | बुद्धि |
| ३ | इच्छा | ११ | मनःसंकल्प |
| ४ | द्वेष | १२ | विचारणा |
| ५ | प्रयत्न | १३ | स्मृति |
| ६ | प्राण | १४ | विज्ञान |
| ७ | अपान | १५ | अध्यवसाय |
| ८ | उन्मेष | १६ | विषयोपलब्धि |

**तस्य सुखदुःखे इच्छाद्वेषौ प्रयत्नः प्राणापानावुन्मेषनिमेषौ बुद्धिर्मनःसङ्कल्पो विचारणा स्मृतिर्विज्ञानमध्यवसायो विषयोपलब्धिश्च गुणः । सु.शा. १/१८**

## सांख्यायुर्वेदमत भेदसूचक कोष्ठक –

| क्र. | मतभेद स्थान | सांख्य | आयुर्वेद |
|---|---|---|---|
| १ | सृष्टीचे कारण | प्रकृति | स्वभावादि (सु.शा. १/१०) |
| २ | इन्द्रिय | अभौतिक | भौतिक (सु.शा. १/१४) |
| ३ | पुरूष | विभु निर्गुण | अणु आणि सगुण (सु.शा. १/१६-१७) |

## अधिदैवत –

स्वः स्वश्चैषां विषयोऽधिभूतः स्वयमध्यात्मः अधिदैवतं तु-बुद्धेर्बम्हा,
अहङ्कारसेश्वरः, मनसश्चन्द्रमाः, दिशः श्रोत्रस्यः, त्वचोवायुः,
सर्वश्चक्षुषः, रसवस्थापः, पृथ्विवी घ्राणस्थ, वाचोऽग्निः, हस्तयोरिन्द्रः,
पादयोर्विष्णुः, पायोर्मित्रः, प्रजापतिरूपस्थस्येति ॥
सुश्रुत शारीरस्थान – १/६

## अधिदैवत

| | | | |
|---|---|---|---|
| बुद्धि – ब्रह्म | रसना – जल | अहंकार – ईश्वर | घ्राण – पृथ्वी |
| मन – चन्द्रमा | वाणी – अग्नि | श्रोत्र – दिशा | हस्त – इन्द्र |
| त्वचा – वायु | पाद – विष्णु | नेत्र – सूर्य | गुद (वायु) – मित्र |
| उपस्थ (जननेंद्रिय) – प्रजापति | | | |

## अव्यक्त – (प्रकृति किंवा प्रधान) –

| व्यक्त लक्षण | अव्यक्त लक्षण |
|---|---|
| हेतुमत् | अहेतुमत् |
| अनित्य | नित्य |
| अव्यापी | व्यापी |
| सक्रिय | निष्क्रिय |
| अनेक | एक |
| आश्रित | अनाश्रित |
| लिङ्ग | अलिङ्ग |
| सावयव | अनवयव |
| परतन्त्र | स्वतंत्र |

व्यक्त आणि अव्यक्त असे दोन प्रकार सांख्यकारिकेमध्ये वर्णित आहेत.

**हेतुमदनित्यमत्यापि सक्रियमनेक माश्रित लिंङगम् ।**
**सावयवं परतन्त्रं व्यक्तम्, विपरीतमव्यक्तम् ।।१०।। सांख्यकारिका**

अर्थात अव्यक्त अहेतुमत्, नित्य, व्यापी, निष्क्रिय, एक, अनाश्रित, अलिङ्ग, अनवयव आणि स्वतंत्र या गुणांनी युक्त असतो.

## सांख्यकारिका –

सांख्यदर्शनाच्या चोवीस तत्वामध्ये एक प्रकृति, ही गुणविशिष्ट कारणास्तव अव्यक्त संबोधली जाते. चरक संहितेमध्ये अव्यक्त म्हणजे जे उत्पत्ति धर्म रहित, नित्य आणि अतीन्द्रिय अर्थात इन्द्रिय द्वारा अग्राहय, तसेच ज्याचा अनुभव केवळ लक्षणाद्वारे



केल्या जातो. अशा प्रकारे चरकांमध्ये वर्णित अव्यक्त पुरूषाधिष्ठित मूलप्रकृति किंवा सगुण आत्मा होय.

सांख्य-शास्त्रामध्ये हेतुमत्, अनित्य, अव्यापी, सक्रिय, अनेकाश्रित, लिङ्गयुक्त, सावयव, परतन्त्र हे गुण अव्यक्ताचे सांगितले आहेत चरकसंहितेमध्ये अव्यक्त प्रकृति किंवा सगुण आत्मा या व्यतिरिक्त तेविस तत्व व्यक्त आहेत. याच व्यक्त तत्वास श्रेत्र म्हणतात आणि या श्रेत्राचा जो ज्ञाता असतो त्यास श्रेत्रज्ञ म्हणतात. अव्यक्त एक, अचेतन आणि अधिष्ठान रूप असून क्षेत्रज्ञ अनेक, सचेतन आणि आश्रयी गुण युक्त असतो.

अव्यक्त अचेतन आहे जेव्हा याचा संयोग चेतनायुक्त पुरूषासोबत होतो तेव्हा महाभूतांची उत्पत्ति होते.

## अव्यक्तापासून सृष्टी उत्पत्ति –

अव्यक्तापासून त्याच स्वभावानी युक्त (सत्वरजस्तमः स्वभाव) महत् (बुद्धितत्व) या तत्वाची उत्पत्ति होते. आणि या त्रिगुणात्मक स्वभाव युक्त बुद्धितत्वापासून त्याच स्वभावानी युक्त (त्रिगुणात्मक) अहंकार उत्पन्न होतो.


अहंकार तीन प्रकारचा असतो.

१) वैकारिक (सात्विक)
२) तैजस (राजस)
३) भूतादि (तामस)

यामध्ये राजस अहंकाराच्या सहकार्याने सात्विक अहंकारापासून एकादश इन्द्रियाची उत्पत्ति होते. (श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण, वाक्, पाणि, पाद, पायु, उपस्थ, मन)

राजस अहंकाराच्या सहकार्याने तामस अहंकारापासून तत्स्वभावाच्या पंचतन्त्रांची उत्पत्ति होते.

जसे शब्द तन्मात्रा, स्पर्श तन्मात्रा, रूप तन्मात्रा, रस तन्मात्रा, गंध तन्मात्रा या तन्मात्रेचे विशेष गुण शब्द, स्पर्श रूप, रस, गंध असून या तन्मात्रेपासून आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी या पंचमहाभूताची उत्पत्ती होते. अशा प्रकारे चोवीस तत्वात्मक पुरूषाची निर्मिती होते.






# महत्

अव्यक्त आणि त्रिगुणसाम्यावस्था स्थित प्रकृति - पुरूष यांचा संयोग होताच स्वयं अव्यक्तावस्था आणि त्रिगुणसाम्यावस्था यांचे रूपांतर होवून व्यक्त आणि त्रिगुण वैषम्ययुक्त अनेक तत्वांची निर्मिती होते, त्या मधील प्रथम तत्व महान (महत्) हे होय. यालाच बुद्धितत्व असे संबोधतात.

या तत्वपरंपरेचा प्रारंभ तेव्हाच होतो जेव्हा प्रकृति पुरूषाधिष्ठित असते.

**यदेतद्विवृतं बीजं प्रधान पुरूषात्मकम् ।**
**महत्तत्वमिति प्रोक्तं बुद्धितत्त्वं तदुच्यते ।।**

सारासार विचार करून एखाद्या विषयाच्या संबंधी निश्चित करणे, किंवा कार्यकारण संबंधाचा विचार करून निश्चिती करणे, अन्य प्रकारे कार्याकार्य निर्णय करणे हे बुद्धिचे कार्य होय. अशा प्रकारच्या कार्यास व्यवसाय किंवा अध्यवसाय म्हणतात.

**व्यवसायात्मिका बुद्धिः ।। (महाभारत),**
**अध्यवसायो बुद्धिः ।।**

– सांख्यकारिका २३

## महत् तत्त्व : (बुद्धिलक्षण व कार्य) –

अध्यवसायो बुद्धिर्धर्मो ज्ञानं विराग ऐश्वर्यम् ।
**सात्विकमेतद् रूपं तामसमस्माद्विपर्यस्तम् ।**

– सां.का. २३

बुद्धिचा अर्थ अध्यवसाय म्हणजेच कार्य व अकार्यच्या विषयी निश्चय करणे. सात्विक बुद्धिचे चार गुण आहेत. धर्म, ज्ञान, विराग, ऐश्वर्य. यांच्या विपरित तामस बुद्धिचे अधर्म, अज्ञान, अवैराग्य, अनैश्वर्य असे चार गुण आहेत.

धर्म – अभ्युदय आणि निःश्रेयस यांचा हेतू होय. उदा. यज्ञ, दान अनुष्ठान आदि पासून उत्पन्न धर्म अभ्युदय याचा हेतू होय आणि अष्टांग योग यांच्या अनुष्ठानाने उत्पन्न धर्म निःश्रेयस याचा हेतू होय.

कणाद यांनी धर्माचे लक्षण 'यतोभ्युदयनिःश्रेयस् सिद्धी स धर्मः' असे वर्णन केले

आहे. अर्थात ज्यामुळे अभ्युदय व निःश्रेयस यांची सिद्धी होते त्यास धर्म असे म्हणतात.

कार्य - सार, असार, कार्य-कारण सम्बध, कार्याकार्य प्रकृति यांचा निश्चय करणे अशा प्रकारच्या कार्यास व्यवसाय किंवा अध्यवसाय म्हणतात. याकरिता बुद्धिस 'व्यवसायात्मिका' संबोधतात.

भगवद् गीतेमध्ये याच बुद्धीचे सात्विक, राजसिक आणि तामसिक भेद वर्णित आहे.

**प्रवृत्ती च निवृत्ती च कार्याकार्य भयाभये ।**
**बन्धं योक्षं च या वेत्तिः सा पार्थ सात्विकी ।**
**यथा धर्ममधर्म च कार्य चाकार्यमेव च ।**
**अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ।।**
**अधर्म धर्ममिति या मन्यते तमसावृत्ता ।**
**सर्वार्थान् विपरीतांश्य बुद्धिः सा पार्थ तामसी ।।**

– भगवद् गीता अ. १८/३०-३२

**धर्मोंज्ञानं विराग ऐश्वर्यम् । सात्विकमेतद्रुपं तामसमस्याद्विपर्यस्तम् ।।**

– सांख्यकारिका २३

बुद्धितत्वाची विशालता आणि व्यापकता लक्षात घेता त्यास महत् संज्ञा दिली आहे.

**बुद्धेर्महत्तत्वसंज्ञाच स्वेतरसकलकार्यव्यापकतवान्मह हैश्यर्याच्चान्वितार्थ ।।**
**अव्यक्तस्य लिंङ्गमिव लिङ्ंग यस्य ।**

अव्यक्त ज्या प्रकारे त्रिगुणात्मक असतो त्याच प्रकारे महत् सुद्धा त्रिगुणात्मक असतो परंतु फरक एवढाच असतो की, अव्यक्त मध्ये त्रिगुण साम्यावस्थेमध्ये असतो तर महत् मध्ये तो विषमावस्थेमध्ये असतो.



# अहंकार

अहं उपसर्ग + कृ धातुला घञ् प्रत्यय लागून अहंकार शब्द बनतो.

**अहमिती ज्ञानं क्रियतेऽनेन' ।**

अहं असे ज्ञान ज्याद्वारे होते त्यास अहंकार म्हणतात.

अहंकाराचे पर्याय - अहंकार, गर्व, अभिमान.

अहं अहं करणे, अभिमान किंवा पृथक्त्व म्हणजे अहंकार.

प्रकृति पासून महत् तत्व उत्पन्न होऊन सुद्धा त्याचे एकत्व नष्ट झाले नव्हते. परंतू जेव्हा अहंकाराची उत्पत्ती झाली तेव्हा त्यामध्ये अनेकत्व आणि पृथकत्व निर्माण झाले. त्याच अहंकारामुळे पाणी, दगड, प्राणी, वनस्पती इत्यादी स्थावर जङ्गमात्मक अनेक वस्तु तसेच मनुष्यामध्ये अभिमान इत्यादि बाबी निर्माण झाल्या. अहंकार बुद्धिचाच एक प्रकार असल्यामुळे बुद्धिच्या नंतर अहंकाराची उत्पत्ती झाली. बुद्धी प्रमाणेच अहंकाराचे सात्विकादि तीन भेद आहेत.

१) सात्विक अहंकार
२) राजस अहंकार
३) तामस अहंकार

**अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते ।।**

– भगवतगीता ३.२७

**अभिमानोऽहङ्कारः ।**

– सांख्यकारिका २४

अहंकार उत्पन्न झाल्यानंतर सृष्टीचे मुख्य दोन विभाग होतात. एक वनस्पती, प्राणी, मनुष्य इत्यादी इंद्रियेयुक्त अर्थात सेंद्रियसृष्टि आणि दुसरा इंद्रियविरहित अर्थात निरिंद्रियसृष्टि (जडसृष्टि)

**सेंन्द्रियं चेतनं द्रव्यं निरिन्द्रियमचेतनम् ।।**

– च.सू. १

येथे इंद्रिय शब्दाने केवळ इंद्रिययुक्त प्राण्यांच्या इंद्रियांची शक्ती एवढाच अर्थ अभिप्रेत आहे. सेंद्रिय सृष्टीचा विचार करते वेळी सांख्य शास्त्रामध्ये केवळ इंद्रियांचा विचार केला आहे. सेंद्रिय आणि निरेंद्रिय या व्यतिरिक्त सृष्टीचा तिसरा विभाग असंभव असल्याकारणास्तव अहंकाराचे केवळ दोन विभाग होतात.

१) सेन्द्रिय - चेतन सृष्टी

२) निरिन्द्रिय - अचेतन सृष्टी

**अभिमानोऽहङ्कारः तस्माद्विविधः प्रवर्तते सर्गः ।**
**एकादशकश्च गणस्तन्मात्रापंचकश्चैव ।। (सांख्यकारिका २४)**

**एवं द्विविध एव सर्गोऽहङ्कारात, न त्वन्य इति एवं कारेणाधारयति ।**
**(वाचस्पति मिश्र)**

इंद्रियशक्ति श्रेष्ठ असल्याकारणास्तव सेंद्रियसृष्टीची उत्पत्ती सात्विक (सत्वगुणोत्कर्ष) अहंकारापासून आणि निरिंद्रियसृष्टि तामस अहंकारापासून मानली आहे. परंतु पित्तसमान सत्त्व आणि कफसमान तम हे पंगु म्हणजेच निष्क्रिय असतात. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या सृष्टी मध्ये प्रवर्तक असा रज गुण सहाय्यक असतो.


**उपष्टम्भकं चलं च रजः ।। (सा.का. १३)**

**रजश्च प्रवर्तक सर्वभवानाम् । (सुश्रुत, प्रथमखण्ड पृष्ठ १३७)**

**सात्विक एकादशकः प्रवर्तते वैकृतादहकारात् ।**
**भूतादेस्तन्मात्रः स तामसस्तैजसादुभयम् ।। (सां.का. २५)**

तैजस अहंकाराच्या सहकार्याने वैकृत अहंकारापासून सात्विक एकादश इन्द्रियांची उत्पत्ति होते आणि तैजस अहंकाराच्या सहकार्याने भूतादि अहंकारापासून तामस पंचतन्त्रांची उत्पत्ति होते.





# पंचतन्मात्रा

## तन्मात्रा व्याख्या –

**पञ्चेन्द्रिऽग्राह्याणि शब्दादीन्येव तन्मात्राणि च !**

१) पंचेन्द्रियद्वारे ज्यांचे ग्रहण किंवा ज्ञान होवू शकत नाही अशा सूक्ष्मस्वरूप असणाऱ्या शब्दादि (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) यास तन्मात्रा असे म्हणतात.

२) शरीर निर्माण किंवा स्थूलमहाभूतांच्या निर्मितीपूर्व पंचमहाभूत आपल्या विशुद्ध प्राकृतिक अवस्थेमध्ये असतात तेव्हा त्यास तन्मात्रा असे म्हणतात. (वेदान्त दर्शन)

भूतादि (तामस) अहंकार आणि तैजस (राजस) अहंकार यांच्या सहकार्याने सूक्ष्म तत्व रूप पंचतन्मात्राची उत्पत्ती होते. जे क्रमशः पंचमहाभूतांच्या उत्पत्तीचे बीजभूत अर्थात कारण स्वरूप असते. अहंकारापासून उत्पन्न होवून महाभूतांची उत्पत्ती करतात. म्हणून पंचतन्मात्रास प्रकृति विकृति संबोधतात.

तन्मात्रा एकुण पाच आहेत.

पंचतन्मात्रा अत्यन्त सूक्ष्म असतात.

पंचतन्मात्रा नित्य, सूक्ष्म तथा अतीन्द्रिय आहे.

**तन्मात्राप्यविशेषास्तेभ्यो भूतानि पंचपंचभ्यः ।**
**एते स्मृता विशेषाः शान्ताः घोराश्च मूढाश्च ।। सां.का. ३८**
**तन्मात्राणि अविशेषाः ।**

सांख्यदर्शनामध्ये तन्मात्रा सुख-दुःख मोहादि धर्मांनी युक्त नसल्याकारणाने त्यास 'अविशेष' म्हणतात.

वैशेषिकांनी तन्मात्रेस परमाणू संबोधले आहे.

चरकांनी त्यास सूक्ष्मभूत म्हटले आहे.

सांख्यांनी तन्मात्रा संबोधले आहे.

अशा प्रकारे वैशेषिकांचा परमाणू, सांख्याची तन्मात्रा, चरकांचे सूक्ष्मभूत हे सर्व एकच तत्त्व आहे. या पाच तन्मात्रांपासूनच पंचमहाभूतांची उत्पत्ती होते. यांचा उत्पत्ती-क्रम खालील प्रमाणे आहे.

१) आकाश महाभूत – सर्व प्रथम शब्द तन्मात्रेपासून शब्द गुणात्मक आकाश



महाभूतांची उत्पत्ती होते.

२) वायु महाभूत – शब्द व स्पर्श तन्मात्रेपासून शब्द आणि स्पर्श गुणांनी युक्त **वायु महाभूताची उत्पत्ती होते.**

३) तेज महाभूत – शब्द, स्पर्श, रूप तन्मात्रेपासून शब्द, स्पर्श, रूप गुणांनी युक्त अग्नि महाभूताची उत्पत्ती होते.

४) जल महाभूत – शब्द, स्पर्श, रूप, रस तन्मात्रेपासून शब्द, स्पर्श, रूप, रस गुणांनी युक्त जल महाभूताची उत्पत्ती होते.

५) पृथ्वी महाभूत – शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध तन्मात्रेपासून शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध गुणांनी युक्त महाभूताची उत्पत्ती होते.

| तन्मात्रा | महाभूत उत्पत्ती |
|---|---|
| शब्द | आकाश |
| शब्द + स्पर्श | वायु |
| शब्द + स्पर्श + रूप | तेज |
| शब्द + स्पर्श + रूप + रस | जल |
| शब्द + स्पर्श + रूप + रस + गंध | पृथ्वी |

आकाश स्थूल महाभूत – १/२ आकाश (तन्मात्रा) + १/८ वायु (तन्मात्रा) + १/८ अग्नि (तन्मात्रा) + १/८ जल (तन्मात्रा) + १/८ पृथ्वी (तन्मात्रा)

वायु स्थूल महाभूत – १/२ वायु (तन्मात्रा) + १/८ आकाश (तन्मात्रा) + १/८ अग्नि (तन्मात्रा) + १/८ जल (तन्मात्रा) + १/८ पृथ्वी (तन्मात्रा)

अग्नि स्थूल महाभूत – १/२ अग्नि (तन्मात्रा) + १/८ आकाश (तन्मात्रा) + १/८ वायु (तन्मात्रा) + १/८ जल (तन्मात्रा) + १/८ पृथ्वी (तन्मात्रा)

जल स्थूल महाभूत – १/२ जल (तन्मात्रा) + १/८ आकाश (तन्मात्रा) + १/८ वायु (तन्मात्रा) + १/८ अग्नि (तन्मात्रा) + १/८ पृथ्वी (तन्मात्रा)

पृथ्वी स्थूल महाभूत – १/२ पृथ्वी (तन्मात्रा) + १/८ आकाश (तन्मात्रा) + १/८ वायु (तन्मात्रा) + १/८ अग्नि (तन्मात्रा) + १/८ जल (तन्मात्रा)

स्थूल महाभूत या निर्माण अवस्थेपर्यन्त पोहचण्याकरिता पंचमहाभूतास खालील पाच अवस्थेमधून जावे लागते.

१) प्रथम अवस्था – प्रत्येक महाभूत आपल्या स्वतंत्र विशुद्ध अवस्थेमध्ये असतो **तेव्हा त्या अवस्थेस तन्मात्रा म्हणतात.**

२) द्वितीय अवस्था – या अवस्थेमध्ये प्रत्येक तन्मात्रा दोन भागांमध्ये विभक्त

होण्याच्या अवस्थेमध्ये असते.

३) तृतीय अवस्था : प्रत्येक तन्मात्रा दोन भागामध्ये पूर्णतः विभक्त होते.

४) चतुर्थ अवस्था : या अवस्थेमध्ये प्रत्येक महाभूताची एक अर्ध तन्मात्रा आणि इतर अर्ध तन्मात्रा चार समान भागामध्ये विभाजित होतात. हाच प्रत्येक भाग संपूर्ण तन्मात्रेचा आठवा भाग असतो. अशा प्रकारे या अवस्थेमध्ये प्रत्येक तन्मात्रा पाच भागामध्ये विभाजित होते. एक भाग अर्धा असतो आणि अन्य शेष भागाचे चार भाग १/८ भागामध्ये विभाजित होतात.

५) पंचम भाग - या अंतिम अवस्थेमध्ये प्रत्येक अर्ध तन्मात्रा त्याच अवस्थेमध्ये राहून अन्य शेष चार महाभूतांच्या आठव्या विभाजित भागाशी संयुक्त होवून स्थूल महाभूतामध्ये परिवर्तित होते.



## संदर्भ सूची/ग्रंथाधार


१) चरक संहिता - सिद्धिस्थान अध्याय १२
२) सुश्रुत संहिता - उत्तरतंत्र अध्याय ६५
३) अष्टांग संग्रह - उत्तरतंत्र अध्याय ५०
४) अष्टांग संग्रह - उत्तरतंत्र अध्याय ४०
५) भट्टार हरिश्चंद्र टीका - चरकसंहिता
६) चक्रपाणि टीका - च.सि. १२
७) डल्हण टीका - सु.उ. ६५
८) अरूणदत्त टीका - अ.हृ.उ. ४०
९) हेमाद्रि टीका - अ.हृ.उ.
१०) वाचस्पत्यम्
११) शब्द कल्पद्रुम
१२) तन्त्रयुक्ति - वैद्य हिर्लेकर
१३) वैद्य धर्माधिकारी अनंत यांची व्याख्याने
१४) पदार्थ विज्ञान - वैद्य प्रमा जोशी
१५) पदार्थ विज्ञान - वैद्य राम कुमार जैन


## आभार


वैद्य अनंत धर्माधिकारी - Ex-Director of Ayurved, Maharashtra State Prof. Kaya Chikitsa.

वैद्य स.प्र. सरदेशमुख - Dean, Ayurved Faculty, TMV, Pune. Chairman, B.S.D. Trust, Wagholi, Pune

वैद्य जयंत देवपुजारी - CCIM Member 2015

सौ. अंजलि सराफ - M.B.A. (H.R.), B.Sc. (Chem.)

वैद्य पुष्पा नेमाडे - Reader, Samhita Dept., B.S.D.T., Wagholi, Pune